# श्री साईलीला



जुलै १९७७ ] खास श्री दत्त अंक [ किंमत ७५ पैसे

# अनुक्रमणिका जुलै १९७७


१) संपादकीय — शिर्डीतील गुरुपौर्णिमा उत्सवाची जन्मकथा

२) श्री अवधूत स्वामी लिमये महाराज — सदानंद चेंदवणकर

३) श्रीसाईनाथ अवधूत — श्री. अ. ज. चितांबर

४) संत आणि गुरु — डॉ. के. भ. गव्हाणकर

५) श्रीदत्तात्रेयांचे २४ गुरु — डॉ. अनिल जायस्वाल

६) दोन दत्तावतार — श्री. चंद्रकांत सामंत

७) श्री गुरु गौरव — श्री. चकोर आजगांवकर

८) सद्‌गुरु प्राप्ती — श्री. वि. अ. कुलकर्णी

९) भगवान श्री दत्तात्रेय — श्री. सुभाषचंद्र

१०) भगवान दत्तात्रेयांचे निवासस्थान — माहूर

११) श्री दत्तात्रेयांचे पहिले अवतार — श्रीपाद श्रीवल्लभ

१२) श्री दत्तात्रेयांचे दुसरे अवतार — श्री. नृसिंह सरस्वती

१३) श्री दत्तात्रेयांचे अलिकडील अवतार — श्री अक्कलकोट स्वामी

१४) श्री दत्तात्रेयांचे साक्षात् अवतार — श्री. माणिक प्रभु

१५) शिर्डी वृत्त —

१६) दत्तावतार — कु. शशिकला साळगांवकर

१७) श्री दत्त स्तवन — श्री. महादेव दत्तात्रय भिडे

१८) अश्रूंची फुले — श्री. जगदीश देवपुरकर

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

भक्तीं करावे मनोरथ ।
ते न जाणती खरा स्वार्थ ।
गुरु एक जाणे शिष्याचें हित ।
भावी – भूत - वर्तमान ॥ ५६ ॥
निजमनींचें मनोगत ।
कोणी कितीही ठेवो गुप्त ।
साई समर्थ सर्वगत ।
अंतर्वृत्त जाणे तो ॥ ५७ ॥
जेव्हा कोणी मनींचे हृद्गत ।
साई चरणीं प्रेमें निवेदित ।
पूर्ण विश्वासें अनुज्ञा प्रार्थित ।
दावित सत्पथ साई त्यां ॥ ५८ ॥
हें तो तयांचें निजव्रत ।
जाणती हें भक्त समस्त
जो जो अनन्य शरणागत ।
आपदा वारीत तयांच्या ॥ ५९ ॥
गुरूचि सत्य माता-पिता ।
अनेका जन्मींचा पाता-त्राता ।
तोचि हरिहर आणि विधाता ।
कर्ता-करविता तो एक ॥ ६० ॥

— श्रीसाईसच्चरित - अध्याय २५ वा.

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] जुलै ७७ [ अंक ४

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

### स. न. वि. वि.

# शिर्डीतील गुरुपौर्णिमा उत्सवाची रम्य जन्मकथा

● शिर्डी येथे दरवर्षी व्यासपौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा ही तिथी अतीव उत्साहाने उत्सवाच्या रूपाने साजरी केली जाते. या निमित्याने हजारो श्रीसाईभक्त शिरडीत तीन दिवस एकत्र येतात व बाबांचे डोळे भरून दर्शन घेऊन त्यांची आपापल्या परीने शक्य तितकी सेवा करतात. या उत्सवाचा बाबांच्या विविध लीलांशी संबंध असल्यामुळे त्या तत्कालीन लीलांची रंजक माहिती या गुरुपौर्णिमेला उत्सवाच्या निमित्याने मुद्दाम देत आहोत.

### नास्तिक तात्यासाहेब नूलकर

१९०९ सालची गोष्ट आहे ही. श्री. तात्यासाहेब नूलकर हे मागाहून बाबांचे परम व निष्ठावान् भक्त झाले असले तरी तत्पूर्वी त्यांचा साधुसंतांवर व देवावर विश्वास नव्हता. हे सब झूट है असे मानणारे ते एक नास्तिक गृहस्थ होते. बाबांच्या भेटीसाठी आस्तिक येत असत, त्याचप्रमाणे केवळ कुतूहल म्हणून नास्तिकही येत असत.

श्री. नानासाहेब चांदोरकर हे बाबांचे परम भक्त. त्यांची बाबांवर परमनिष्ठा. ध्यानी मनी बाबा. जो भेटेल त्याच्याजवळ बाबांचे गुणगान व शिरडीस जाण्याचा आग्रह. प्रत्येकाने आपले कल्याण साधावे, हाच त्यामध्ये त्यांचा हेतू असे. तो हेतू साध्य होवो न होवो. त्यांचा आग्रह सतत चालू असावयाचा. नानासाहेब हे पंढरपूर येथे मामलेदार असता श्री. तात्यासाहेब नूलकर हे तेथे मुनसब होते. ते नास्तिक असले तरी भेट झाली म्हणजे नानासाहेबांचा त्यांच्या मागे नेहमी लकडा असे की, 'शिरडीला चला व साईबाबांचे दर्शन घेऊन पुण्य पावन व्हा.' तात्यासाहेबांच्या नकाराने नानासाहेब निराश होत नसत. उलट त्यांचा उत्साह दुणावत असे. महिनेच्या महिने आणि वर्षेच्या वर्षे हा प्रकार चालू होता.

नानासाहेबांचा पूर्ण विश्वास होता की, तात्यासाहेब कितीही पाखंडी व नास्तिक असले तरी एक दिवस असा उजाडेल की, ज्या दिवशी तात्यासाहेबांचा नास्तिकपणा लयास गेलेला असेल व तो जावा अशी त्यांची मनापासून इच्छा होती.

## नानासाहेबांचा आग्रह

'ती माझी बाजू नव्हे; माझे त्या गोष्टीकडे लक्ष नसता तुम्ही उगाच का माझ्या मागे हात धुवून लागता ? मला शिरडीला यायचे नाही हे कितीदा सांगू तुम्हाला?' असे एके दिवशी तात्यासाहेब वैतागून म्हणाले. तरी नानासाहेब चांदोरकरांनी त्यांचा पिच्छा सोडला नाही.

परंतु कर्मधर्मसंयोग मोठा विचित्र असतो. एक दिवस असा उजाडला की तात्यासाहेब म्हणाले ' हे पहा ! नानासाहेब ! तुमचा फार दिवस आग्रह चाललेला आहे. तो ऐकून ऐकून मी कंटाळलो आहे. तेव्हा तुमच्या इच्छेखातर मी शिरडीला येतो. परंतु तत्पूर्वी माझ्या २–३ अटी आहेत, त्या पूर्ण कराव्या लागतील.':

नानासाहेबांस आनंद झाला. जो गृहस्थ शिरडीचे नाव घ्यायला तयार नव्हता तो काही अटींवर का होईना, यायला तयार झाला, हे काही कमी महत्त्वाचे नव्हते.

"बरं बुवा ! सांगा पाहू अटी काय त्या !" नानासाहेबांनी मोठ्या उत्कंठेने विचारले.

"माझी पहिली अट म्हणजे स्वयंपाक करण्यासाठी सध्या माझ्याजवळ ब्राह्मण नाही तो मला मिळवून द्या. त्याशिवाय मला बाहेर पडता येणार नाही. दुसरी अट म्हणजे मी शिरडीला आल्यावर बूट पाटलोण काढल्यांशिवाय तुमच्या बाबांसमोर येईन व त्यांना नमस्कार बिमस्कार काहीएक करणार नाही. केवळ एक चैनीखातर सहल म्हणून येईन. बोला, आहे कबूल ?"

'अगदी कबूल ! परंतु या म्हणजे झाले, केव्हा जायचे तो दिवस लौकरच ठरवू या'–असे सांगून नानासाहेबांनी त्यांचा निरोप घेतला.

## ब्राह्मणाचे आकस्मिक आगमन

पुढे काय काय गोष्टी कसकशा घडत गेल्या त्या पहा ! स्वयंपाकासाठी ब्राह्मण हवा होता. त्याच दिवशी सायंकाळी नानासाहेबांकडे एक ब्राह्मण स्वयंपाक्याची नोकरी

मागण्यासाठी आला. त्यांना त्याची जरूरी नव्हती; परंतु तात्यासाहेबांस होती. त्यांनी चिठी देऊन त्याला तात्यासाहेबांकडे पाठविले. त्यांना तो ब्राह्मण पसंत पडून त्याला नोकरीस ठेविले.

या ठिकाणी तात्यासाहेबांस पहिला छोटासा धक्का बसला. मी आचाऱ्याची मागणी करावी व त्याचा उदय आजच व्हावा, हे कसे काय ?

शिरडीला जाण्याचा दिवस सुकर झाला. तो दोघांच्याहि मते ठरला. परंतु पुन्हा एकाएकी एक विघ्न उद्भवले. विघ्न म्हणा की काही म्हणा ते उद्भवले खरे ! तात्यासाहेब म्हणाले, शिरडीत नेण्यासाठी मला नागपुरी उत्तम संत्री मिळाली पाहिजेत. ती मिळाल्याशिवाय मला जावेसे वाटत नाही !

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी तात्यासाहेब आपल्या घराचा दरवाजा उघडतात तोच दरवाजाजवळ उत्तम नागपुरी संत्र्यांचा करंडा कोणीतरी आणून ठेवलेला होता. पार्सल कसले ते प्रथम त्यांना समजणे शक्य नव्हते. उघडून पाहता आत उत्तमोत्तम १०० संत्री आढळून आली.

हा तात्यासाहेबांना बसलेला धक्का नंबर दोन.

बाबा ही साधी-सुधी व्यक्ति नाही, असे आता तात्यासाहेबांना वाटू लागले. त्यांना आपोआप शिरडीची ओढ लागली. त्यांनी संत्र्यांच्या पार्सलची गोष्ट नानासाहेबांना सांगितली व ती त्यांनी शांतपणे ऐकून घेतली.

## हे वेडबंबू कोण आणलेस ?

शेवटी हे दोघेही मित्र शिरडीस जाण्यासाठी निघाले व शिरडीत येऊन पोचले. मी बुट पाटलोणीतच येणार असे म्हणणारे तात्यासाहेब डळमळले. त्यांचे त्यांनाच वाटू लागले की आपण भलतेच काही तरी बोलून गेलो. त्यांनी दर्शनास जाण्यापूर्वी बूट पाटलोण काढून ठेवली व शुभ्र धोतर नेसून ते द्वारकामाईत बाबांच्या दर्शनाला गेले. त्यांच्यापुढे त्यांनी भक्तिभावपूर्वक साष्टांग लोटांगण घातले व हात जोडून उभयता त्यांच्यापुढे उभे राहिले.

"अरे ! हे वेडबंबू बरोबर कोण आणले आहेस आज ?" बाबांनी त्यांच्याकडे पाहात नानांना प्रश्न केला. तो प्रश्न ऐकताच ते मनातल्या मनात दचकले. मी जे जे काही बोललो ते बाबांना समजले असावे. त्याशिवाय का ते असा प्रश्न एकदम करतील ?

तात्यासाहेबांचे मन हेलकावे खाऊ लागले होते. नास्तिकतेची नशा अजून साफ उतरली नव्हती. मनात गोंधळ उडून गेलेला होता. त्यांच्या जीवनातील तो महत्त्वाचा व क्रांतिकारक क्षण होता. आपल्या मनाची ही स्थिती त्यांनी मित्रत्वाच्या नात्याने नानांना बोलून दाखविली. त्यावर नानासाहेब म्हणाले, "काही चिंता करू नका. बाबा परम दयाळू आहेत. तुमच्या सारे शंका निरसन करून ते तुम्हाला योग्य मार्गावर आणून ठेवतील. त्यांना सर्वांची चिंता आहे!"

## बाबांचा नृसिंहावतार–

नानासाहेबांनी आश्वासन दिले असले तरी तात्यासाहेब नूलकरांची बेचैनी कमी झाली नाही. पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी ते नानांच्या बरोबर द्वारकामाईत बाबांच्या दर्शनास गेले असता बाबांनी नृसिंहावतार धारण केला. त्यांनी तात्यांना नाना प्रकारच्या शिव्या देऊन त्यांचा उद्धार केला. एवढेच करून न थांबता ते मारण्याचाही आव आणू लागले. तुझा सत्यानाश होईल असे म्हणून बाबांनी त्यांचे डोके अक्षरशः तेथील खांबावर आपटले! व येथून तडक चालता हो असे सांगितले. बाबांचा तो रुद्रावतार पाहून त्यांच्या दर्शनास आलेल्या बहुतेकांनी तेथून आस्ते आस्ते काढता पाय घेतला. आता दुःखीकष्टी अंतःकरणाने तात्यासाहेब पण तेथून निसटले. ते बिऱ्हाडी आले. त्यांनी नानासाहेबांना सारी हकीगत सांगून बाबांचा शाप बाधल्याशिवाय रहाणार नाही असे ते म्हणाले. परंतु नानासाहेबांनी त्यांची समजूत घातली. ते म्हणाले, " सत्यानाश होणार नाही, घाबरू नका. तुमच्यातील, पापांचा, दुर्गुणांचा सत्यानाश होईल असा त्याचा अर्थ आहे. बाबा कधी कोणाचे अकल्याण करीत नाहीत. तुमच्या कल्याणाचा मार्ग त्यांनी मोकळा करून दिलेला आहे. तुम्ही घाबरण्याचे बिलकूल कारण नाही."

## पानतंबाखू खाण्याची तलफ

त्याच रात्रीची गोष्ट. तात्यासाहेब रात्रीं दोन वाजता एकाएकी जागे झाले. त्यांना एकाएकी तंबाखू खाण्याची तलफ आली. पानाशिवाय चुनातंबाखू खाण्याची त्यांना सवय नव्हती, आणि पान तर जवळपास नव्हते. शेजारी नानासाहेब निजले होते. त्यांना उठविले. ते तरी पान त्यावेळी कुठून देणार? शिवाय त्यांना पान खाण्याची संवय नव्हती.

तात्यासाहेबांची तलफ थांबेना. ते म्हणाले, 'कसेही करा; कुठून तरी पान घेऊन या हो!'

'भलतेच काय मागणे ? यावेळीं कुठून आणू मी पान. झोपा पाहू स्वस्थपणे !'

नानासाहेब असे म्हणताहेत तोच द्वारकामाईतून एक इसम चार पानांचा विडा घेऊन आला व दरवाजा ठोठावू लागला. दरवाजा नानासाहेबांनीच उघडला व समोरच्या इसमास 'यावेळी इथे काय ?' म्हणून सरळ प्रश्न केला. तो म्हणाला, 'बाबांनी मला पाने देऊन येथे पाठविले आहे. साठे यांच्या वाड्यात एका गृहस्थास पान तंबाखू खाण्याची लहर लागली आहे तेव्हा तातडीने तेथे जा असे ते म्हणाले, म्हणून मी येथे धावत आलो. हा विडा घ्या व ज्यांना त्याची जरुरी आहे त्याला द्या म्हणजे माझे काम झाले. मी जातो आता.'

तात्यासाहेब हे सारे ऐकत होते. त्यांना यावेळी बसलेला हा चमत्काराचा सर्वात मोठा धक्का होता. झाले, त्यांचा नास्तिकपणा पूर्ण लयाला गेला. बाबांवर त्यांची संपूर्ण श्रद्धा बसली, बाबा प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. अंतर्ज्ञानी आहेत, त्यांची शक्ति अपार आहे, याबद्दल त्यांची खात्री झाली.

तिसऱ्या दिवशी सकाळीं तात्यासाहेब द्वारकामाईत गेले तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "तात्या, उद्या त्या खांबाची पूजा कर."

"बरे आहे!" असे म्हणून ते बिऱ्हाडी आले व त्यांनी घडलेली गोष्ट माधवरावांस (शामा) सांगितली.

ती ऐकून माधवराव द्वारकामाईत गेले तेव्हा बाबा त्यांनाही तेच म्हणाले. परंतु ते म्हणाले, 'खांबाची पूजा का म्हणून करायची ! आम्ही तुमची पूजा करू. प्रत्यक्ष देव आमच्यापुढे असता खांबाची पूजा का म्हणून करायची !'

परंतु बाबांनी आपला आग्रह काही सोडला नाही. त्यानंतर तात्याबा पाटील कोते दर्शनासाठी गेले. त्यांनाही बाबा तेच म्हणाले. ते तसेच माधवरावांकडे आले. सर्व एकत्र जमले. उद्या त्या खांबाची पूजा करा म्हणून बाबा प्रत्येकास का सांगतात, याचा विचार सुरू झाला. उद्या आहे तरी काय ? पंचांग तरी काढून पहा.

पंचांग उघडून पहाण्यात आले. दुसऱ्या दिवशी गुरुपौर्णिमा होती. सर्वांना आश्चर्य वाटले व आनंद झाला. बाबा पंचांग कधी पहात नसत. असे असताना उद्याच खांबाची पूजा करायला सांगतात याचा अर्थ काय ? आपल्या भक्ताकडून त्यांना पूजा घ्यायची असावी असा सर्वांनी तर्क केला.

नंतर माधवराव द्वारकामाईत गेले व उद्या आम्ही तुमचीच पूजा करणार असे सांगू लागले.

"मर्जी तुमची !" एवढेच बाबा म्हणाले.

आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे गुरुपौर्णिमेच्या दिवशी सर्वांनी बाबांची षोडषोपचारे पूजाअर्चा केली तेव्हापासून प्रत्येक वर्षी गुरुपौर्णिमेच्या दिवशी उत्साहपूर्वक व भक्तीभावपूर्वक बाबांची पूजा करण्याची वहिवाट जी सुरू झाली आहे, ती अगदी आजतागायत.

..............


# संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबा

## आता लौकरच प्रकाशित होणार

: लेखक :

● **श्री. का. सी. पाठक**
कोर्ट रिसिव्हर, श्रीसाईबाबा संस्थान

● **सदानंद चेंदवणकर**
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला

+ श्रीसाईबाबांचे सचित्र चरित्र
+ श्रीसाईनाथकालीन व्यक्तींची भरपूर छायाचित्रे
+ श्रीसाईनाथांचे मुखपृष्ठावर संग्राह्य चित्र

**श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे नवे प्रकाशन**

महाराष्ट्रांतील परम दत्तभक्त सत्पुरुष—


# श्री अवधूत स्वामी महाराज लिमये

● सदानंद चेंदवणकर

● मुंबापुरीमध्यें दादर विभागात परमदत्तभक्त आणि श्रीदत्त देवता प्रसन्न असलेले एक अवतारी सत्पुरुष वावरत आहेत. त्यांचे नाव आहे श्री. मोरेश्वर वासुदेव लिमये. पण हे महापुरुष श्री. अवधूत स्वामी महाराज लिमये या नावानेच अखिल महाराष्ट्रात परिचित आहेत. लिमये महाराजांचे अगदी बाल्यावस्थेपासूनच अवतारकार्य चालू आहे. त्यांचा जन्म गुरुवार दिनांक ३ मे १९०६ रोजी देवगड तालुक्यातील इळये या खेडेगावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव वासुदेवराव व आईचे लक्ष्मीबाई. स्वामींचा जन्म होण्याच्या अगोदरच एका महात्म्याने त्यांच्या मातोश्रींना दर्शन देऊन तुझ्या पोटी अवतारी पुरुष जन्माला येणार आहे असे भविष्य वर्तविले होते. बालवयात ते एकदा आपल्या गावी असताना रानात आकाशवाणी झाली की 'हा राम आला.' स्वामींचे वडील श्री. वासुदेवराव मुंबईला तार खात्यात नोकरी करत. स्वामींना परमार्थाचा वारसा त्यांचे आजोबा श्री. विष्णुपंत व चुलते श्री. सखारामपंत यांच्याकडून मिळाला. हे दोघेहीजण धार्मिक वृत्तीचे व देवभक्त होते.

वयाच्या पाचव्या वर्षी एका गुरुवारी आपल्या वडील चुलत भावंडांच्याबरोबर शाळेत आपणहून जाऊन आपले नाव त्यांनी दाखल करून घेतले. त्या शाळेत श्री. दामले नावाचे एक शिक्षक होते. त्यांनी त्यांना रामनामाचे स्मरण करण्याचा उपदेश केला, व मग रामनाम स्मरणाचा त्यांना छंदच लागला.

वयाच्या बाराव्या वर्षी इंग्रजी शाळेत असताना दत्तात्रय शहाणे नावाचे एक वर्गबंधू त्यांचे मित्र झाले. ते दत्तभक्त होते. दर गुरुवारी शाळा सुटल्यावर ते श्रीदत्तमंदिरात जाऊन न चुकता दत्तदर्शन घेत. या मित्राबरोबर किशोर स्वामीही जाऊ लागले. पण पुढे स्वामींचा हा मित्र एकाएकी आजारी पडला व एका गुरुवारीच निधन पावला. त्याच्या मृत्यूनंतर पुढल्याच गुरुवारी स्वामींना स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना त्यांच्या परमप्रिय मित्रांचे दर्शन घडले. त्याने स्वप्नात आपल्या मित्राला सांगितले, 'तू दत्ताची भक्ती कर व नेहमी दत्त दत्त असे म्हणत जा.' त्या दृष्टांतापासून तो आजतागायत स्वामींजी दत्त दत्त म्हणत आले आहेत. आपण परमेश्वराचे महान भक्त



**श्री अवधूत स्वामी महाराज लिमये**

व्हावे असे त्यांना मनोमन वाटू लागले व त्यामुळेच की काय ते वडिलांच्या विरोधाला न जुमानता कथा-किर्तनाला जाऊ लागले.

मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर श्री. लिमये महाराजांनी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात उच्च शिक्षणासाठी प्रवेश केला. १९२३ ते १९२७ हा काळ ते तिथे होते. या काळात त्यांना देवदर्शन व नामस्मरण या आपल्या आवडत्या गोष्टींकडे लक्ष पुरविण्यास भरपूर वेळ मिळाला. कृष्णेच्या घाटावर बसून नामस्मरण करण्यात त्यांचा सायंकाळचा बराचसा वेळ जाई. एका श्रावण शनिवारी रात्री बारा वाजता त्यांना साक्षात् हनुमंताचे दर्शन घडले. इतर काही अद्भुत गोष्टींमुळे आपल्या कॉलेजातील सोबत्यांवर त्यांनी आपला दैवी प्रभाव पाडला. पुढे मसूरचे स्वामी श्रीविनायक महाराज मसूरकर यांचे दर्शन त्यांना लाभले. त्यांनी त्यांना मारुतीची उपासना करण्यास सांगितले. तेव्हा स्वामी त्यांना म्हणाले, मी श्रीदत्त उपासक आहे. आपण श्रीमारुतीची

उपासना करावयास मला सांगता आहात हे जरी खरे असले तरी सर्व देवता एकच आहेत असे आपला धर्म सांगतो. तेव्हा त्यात भेद व हट्ट कशाला ? शिवाय बला-बरोबरच ज्ञानाचीही आवश्यकता आहे. तसे पाहिले तर ब्रम्हा, विष्णु, महेश य सर्वश्रेष्ठ देवता श्रीदत्त प्रभूंमध्ये एकवटल्या आहेत. तेव्हा राष्ट्राचे व धर्माचे तेज आदि दैवत मानण्यास काय हरकत आहे ? तेव्हा मसूरकर महाराजांनी सांगितले की तुमची तशी निष्ठा असेल तर तुम्ही तीच उपासना करा. या नंतर अनेक महात्म्यांच्या व सत् पुरुषांच्या त्यांच्या गाठी भेटी झाल्या. १९२७ साली स्वामीजी बी. ए. झाल्यावर त्यांनी कायद्याचा अभ्यास करावा अशी इच्छा त्यांच्या वडिलांनी प्रदर्शित केली. १९२७–२८ या दोन वर्षात ते पुण्याच्या लॉ कॉलेजात गेले खरे, पण त्य विद्याभ्यासात त्यांना यश लाभले नाही.

बी. ए. नंतर १९३० साली त्यांनी पोस्ट खात्यात नोकरी पकडली. त्यावेळी ते आपले आई-वडील, चार बंधू व बहिण यांचेसमवेत विलेपारले येथे राहात होते परंतु वडिलांचा व स्वामीजींचा स्वभाव भिन्न असल्याने तिथे त्यांचे वारंवार खटके उडू लागले. यातच भर म्हणून की काय स्वामींनी १९३१ साली आपल्याच पसंतीने मुलगी निवडून तिच्याशी ते विवाहबद्ध झाले. पुण्याच्या प्रा. सोवनी यांच्या कन्या कु. यमुना या सौ. सरस्वती लिमये म्हणून वावरू लागल्या. कुटुंबातील मंडळी ही सर्व मोह निर्माण करणारी आहेत असा अनुभव स्वामींना आला आणि म्हणूनच की काय त्यांनी दादर येथे स्वतंत्र बिऱ्हाड केले. त्याठिकाणी राहून त्यांनी परमेश्वर भक्तीची तपश्चर्या तर केलीच, पण कुटुंबियांच्या मोहात मुळीच न पडता त्यांना शक्य तितकी आर्थिक मदत केली. आई-वडिलांचा सक्त विरोध असतानासुद्धा त्यांच्या अंतकाळी त्यांच्याजवळ राहून परमेश्वराचा नाममंत्र त्यांना दिला व मोक्षाची त्यांची वाट खुली करून दिली. विवाहानंतर दोन वर्षांनी स्वामीजी खूप आजारी पडले; इतके की त्यांना मिरजेला हवापालट करण्यासाठी ठेवण्यात आले. १९३५ साली ते पूर्णपणे बरे झाले व पूर्ववत आपल्या नोकरीवर जाऊ लागले.

यानंतर लिमये महाराजांच्या अनेक संत साधु व सतपुरुष यांच्या गाठीभेटी झाल्या, व त्या सर्वांनी त्यांना त्यांच्या अवतार कार्याची जाणीव करून दिली. १९४५ साली गाणगापूरचे श्री आप्पा महाराज, नाशिकचे श्री केसकर महाराज व दादरचे श्री गजानन महाराज बोरकर या त्रयींनी नाशिकला श्री दत्ताची स्थापना केली. या प्रसंगी श्री गजानन महाराज बोरकर यांनी श्री लिमये महाराजांना 'श्री अवधूत स्वामी' हे नामाभिधान सन्मानपूर्वक बहाल केले. श्री लिमये महाराजानी आत्मज्ञान पूर्णपणे प्राप्त करून घेतलेले आहे. महाराजांनी आपल्या परमेश्वरी शक्तीमुळे कित्येक संकटां-

ग्रस्तांना रक्षण दिले आहे तर कित्येक वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या अहंकारावर आघात करून त्यांना नमवले आहे.

आपले सद्गुरू श्री गजानन महाराज बोरकर यांच्या प्रेरणेने लिमये महाराजांनी आपल्या दादरच्या निवासस्थानी प्रवचनादी कार्य सुरू केले. पुढे ग्रंथ लिहिण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. 'मनोविजय' हा त्यांचा पहिला ग्रंथ. त्यात श्री समर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकावरील टीका व पुढे 'आनंदाचा कंद हरी हा' या ग्रंथात संतांच्या हरिपाठावरील टीका व 'आनंदाश्रम' ही स्वतंत्र आध्यात्मिक कादंबरी, असे ग्रंथ लिहिले. हे तिन्ही ग्रंथ भारतात मान्यता पावलेले आहेत.

१९६० साली सद्गुरु श्रीगजानन महाराजांचे निर्वाण झाल्यावर आपली जबाबदारी ओळखून त्यांनी स्वतंत्र आध्यात्मिक धर्मकार्य चालू ठेवले. त्यांच्या दर्शनाला भाविक मंडळी जमू लागली व मग त्यांचा स्वतंत्र शिष्य संप्रदाय सुरू झाला. या शिष्यांना त्यांनी आपल्या तेजाच्या व ज्ञानाच्या प्रवाहाने वश करून घेतले आहे. श्रीमहाराज आपल्या पोस्टातील सेवेतून मुक्त झाले आहेत. लिमये महाराजांचा शिष्यपरिवार मुंबई व मुंबईबाहेरही बऱ्याच ठिकाणी आहे. महाराजांना दोन सुपुत्र आहेत. थोरले श्री. अविनाश (श्री परमानंद स्वामी ) हे बी. एसस्सी असून कनिष्ठ पुत्र श्री. विजय ( श्रीकृष्णानंद स्वामी ) केमिकल इंजिनिअरिंगची परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. धुळे येथील अरविंद ऑईल मिल्सचे मालक श्री. त्रिंबक गणेश गानू ऊर्फ श्रीसच्चिदानंद स्वामी हे महाराजांचे मोठे भक्त असून त्यांचेकडे दरवर्षी महाराजांचे भजन प्रवचनादी कार्यक्रम होतात. श्री. गानू यांनी धुळ्याला भव्य असे विठ्ठल मंदिर बांधलेले आहे. श्रीस्वामींचे एक शिष्य श्री. सुभाष पाटील उर्फ श्री त्यागानंद स्वामी यांनी श्री लिमये महाराजांचे संबंधीचा काव्यात्मक चरित्र ग्रंथ लिहिला असून त्यात ६६ अध्याय व १७०० ओव्या आहेत. श्री महाराजांनी अहल्या व राधा या एकांकी नाटिका लिहून त्या आध्यात्मिक भक्तिमार्गाच्या प्रचाराकरिता रंगभूमीवर आणल्या; तसेच 'शबरी' नामक वीररस व भक्तिरस परिपूर्ण असे नवे नाटक रंगभूमीला सादर केले. त्याचे अनेक प्रयोगही झाले. 'सं. राधाकृष्ण' व 'कळीचा नारद ' ही त्यांची नाटके लौकरच रंगभूमीवर येत आहेत.

श्री अवधूत स्वामी लिमये यांचे वय सध्या ७२ वर्षांचे असून त्यांची प्रकृती उत्तम आहे. आपल्याकडे येणाऱ्या भक्तास ते भक्तिमार्गाचा सदुपदेश करतात व श्रीदत्तगुरुंची उपासना करण्याचा संदेश देतात. श्री लिमये स्वामींचे आध्यात्मिक व भाविकांना भक्तिमार्गाकडे ओढण्याचे कार्य आणखी जोराने चालो हीच श्रीसाई चरणी प्रार्थना. ●

# श्रीसाईनाथ अवधूत

● श्री. अनंत जयदेव चितांबर
गीताभ्यास कार्यालय, दिल्ली दरवाजाजवळ, अहमदनगर

● ॐ "दत्ता अवधूता, साई अवधूता" अशी आरती साईभक्त करीत असतात. या आरतींत साईनाथाना, दत्त या नावानेही हाक मारली असून 'अवधूता' या नावानेही संबोधिले आहे. श्रीदत्तगुरु अवधूत असून त्यांचाच अवतार श्रीसद्गुरुसाईबाबा हेही अवधूत आहेत. परमेश्वराचे कित्येक अवतार 'अवधूत' या स्वरूपात भारतात होत आहेत. अक्कलकोट स्वामीमहाराज व शेगांवचे श्रीगजानन महाराज हेही अवधूतच होत. 'अवधूत' ही संज्ञा अवतारी संतास दिलेली जरी आपणास दिसत असली तरी 'अवधूत' हा योग्यांतील एक पराकोटीचा प्रकार असून अशा सत्पुरुषास 'अवधूत' का म्हणतात? हा विषय विशेष अभ्यासण्याजोगा आहे. 'अवधूत याचा अर्थ आम्हास समजत नाही. अवधूतांचे दर्शन होताच दर्शन घेणाऱ्यात तात्काळ बदल घडतो. तो त्या अवधूतास पाहून त्याच्यापुढे तर्कवितर्क सर्व बाजूस सारून विनम्र होतो. हा अवधूताच्या दर्शनाचा प्रभाव इतका जबर असतो की मनुष्याच्या जीवनाचा प्रवाह बदलतो व तो योग्य दिशेने चालू लागतो. अवधूत त्याच्यावर कृपा करतात. अवधूताचे सामर्थ्य अमित असते. त्यास मर्यादा नसते. पण हे सामर्थ्य केवळ सर्व प्राणिमात्रावर दया, करूणा करण्यासाठीच ते उपयोगात आणतात. हे अवधूतांचे वैशिष्ट्य.

श्रीसाईबाबा अवधूत असून, अवधूताचे अंगी असे कोणते गुण असतात की ज्यामुळे हा अवधूत देवांचाही देव बनतो, देवाधिदेव होतो, याचा अभ्यास केल्यास श्रीसाईबाबा कसे आहेत हेही आपणास सहज सुलभ रीतीने कळेल. कारण अवधूताचे वर्णन करताना, ते श्रीसाईबाबांचेच वर्णन ठरणार आहे. हा दृष्टिकोण वाचकांनी लक्षात घेऊन हा लेख वाचावा म्हणजे बाबांचे सत्यस्वरूप जे दृष्टीच्याही पलीकडचे आहे ते समजण्यास मदत होईल असा मला विश्वास वाटतो. अवधूतांचे खालील वर्णन हे बाबांचेच वर्णन होय यांत शंका धरू नये ही विनंती करतो.

अवधूताविषयी श्रीमद्‌भागवत पुराणात, अकराव्या स्कंधात कथा असून त्या कथेच्या आधारे (अध्याय ७ वा) अवधूत कोण, तो कसा असतो, दिसतो. याचे वर्णन श्रीएकनाथ महाराजांनी, त्यांनी रचलेल्या भागवत ग्रंथात दिलेले आहे. त्याच ग्रंथाच्या आधारे या लेखात अवधूतवर्णन करीत आहे. ती कथा अशी–

यदुवंशातील यदु राजाने एकदा वनात हिंडताना स्वतःच्या तेजाने प्रकाशवंत असलेला असा कोणी एक अवधूत येत असलेला पाहिला. तो ब्रह्मानंदाने डुलत होता. यदु त्या अवधूताच्या लक्षणाचे निरीक्षण करू लागला, तो त्याची खात्री झाली की तो ब्रह्मवेत्ता असला पाहिजे. असा तो अवधूत निर्भय आणि निःशंक असलेला याला आढळला. त्या अवधूताचे पाहणेही नवलाचेच होते. तो अवधूत सर्वांगाने द्रष्टा असून दृश्य पाहात होता. आपण कोठे हिंडत आहोत ह्याचीही त्याच्या चित्तात आठवण नव्हती. तो सर्वत्र संचार करणारा दिसत होता. देहाविषयीच्या अहंतेचा त्याच्या अंगी मागमूसच दिसत नव्हता. तो जणू काय प्रज्वलित झालेला ब्रम्हाग्निच होता. त्यामुळे चारही आश्रमांची घरे जाळून तो निराश्रमी (कोणत्याही आश्रमाचा नव्हे ) होता. त्याच्या आश्रमात शास्त्रश्रवण विधि–वादाची जी पोथी होती ती निश्चितपणे इतकी जळून गेली की तिचे शेष भस्महो सापडू शकले नाही. विधि निषेधांच्या पैजा, त्याही जळाल्या. संचित क्रियांनी निर्माण केलेली पुंजी ही संपूर्णपणे त्या ब्रम्हाग्नित नाहीशी झाली होती. याप्रमाणे तो ब्रह्मानंदाने डुलत येणारा व स्वतःच्याच निजसुखात रमलेला असा अवधूत येताना यदुराजाने पाहिला.

अंगी संकल्प व विकल्प यांनी रहित असलेला व सर्वांगानी शुद्धतेची विभूति लावलेली म्हणून त्यास 'अवधूत' ही संज्ञा. एरव्ही तो सामान्य देहधाऱ्याप्रमाणे दिसणारा. 'अहं' हा अहंकार धुऊन टाकणारा तो 'अवधूत' होय. तोच योगीही होय आणि तोच पवित्र पावन करणाराही होय. देहाला देहपणाच ज्याच्या जवळ नाही त्यास वार्धक्य कोठून येणार ? आणखी त्याचे लक्षण असे की, त्याच्या अंगचा सततचा नवा नवा बोध कधीच मलिन होत नसल्याने, अवधूत आत्मबोधाने, नित्य नव्या तारुण्याने टवटवलेला असतो. निजबोधाच्या सत्तेने, तत्त्वतः द्वैत जिंकून, अद्वैतपणे जगात निःशंकपणे संचार करताना अवधूतास भय म्हणून वाटतच नाही. पृथ्वी भयरहित करण्यासाठीच त्याचा संचार असतो. अवधूताच्या ठिकाणी अशी लक्षणे असल्याचे यदुराजाने अगदी निर्धाराने अवलोकिले. यदुराजाच्या अंगी अवधूताविषयी अत्यंत विनम्र भाव निर्माण झाला आणि त्याच्या ठिकाणी अनिवार श्रद्धाही पण उत्पन्न झाली. यदुराजाने, प्रसन्न चित्ताने, अतिनम्रपणे व श्रद्धेने हात जोडून त्या अवधूतास साष्टांग नमस्कार घालून, त्यास प्रश्न विचारला.

यदुराजा अवधूतास म्हणाला, "स्वामीमहाराज, यमनियम करून किंवा कर्म-मार्गात आचरण करूनही लाभणार नाही अशी अपूर्व बुद्धि तुमचे ठिकाणी आम्हास दिसत आहे. आपण सर्वार्थाने कुशल दिसत असूनही अकर्तात्मबोधाने निःश्चल आहात. आपण सर्वज्ञ दिसत आहात. वेदांत वाक्पटु पोटासाठी ब्रम्हज्ञानाचा विक्रय करतात. काही जण योगज्ञानी म्हणवून घेऊन वायुधारणा करून दाखवितात, पण मनात मात्र विषय जिवंत ठेवतात. पण स्वामी अवधूता, तुम्ही आपले जीवित तृण-प्राय केले आहे आणि सर्व लोकांना तुच्छ करून निजात्महितत्त्व गाठले. अवधूता, आपण सर्वज्ञ असूनही ज्ञातेपण लोकाना दिसू देत नाही. तुम्ही अगदी स्वस्थ दिसता, पण अंगाने विकल कधीच दिसत नाही. आपण काही करीतही नाही व कशाची इच्छाही करीत नाही. ब्रह्मरस पिऊन ब्रह्मानंदाने आपण मस्त व उन्मत्त होऊन निज-रूपात सदा सावध आहात. हेच जगाला वेडेपण दिसते. पण तुम्ही स्वरूपात नेहमी दंग व तृप्त असून परमानंदाचा प्रशांत सागर निर्धाराने दिसत आहात"

असे वर्णन करून यदुराजाने त्या अवधूतास विचारले की, स्वामी महाराज' आपण ब्रह्मवेत्ते असून निजानंदाने परिपूर्ण आहात, त्या आनंदाचे कारण मला विशद करून सांगा. आपल्या देहात विदेहस्थिति वर्तत असताना दिसते. आपल्याला विषय स्पर्श करू शकत नाहीत. ह्या अलिप्तपणाची प्राप्ति कोणत्या रीतीने तुम्हास झाली ? तुम्हास राजाची ना भीड, ना धनवंताची चाड, दीनजनांचे बोलणे आप-णास गोड वाटते, आणि त्यांना बोध करून त्यांची इच्छा पूर्ण करता. तुम्ही अत्यंत कृपाळू, आर्तजनांचे बंधु, दीनदयाळू, व भक्तवत्सल आहात.' याप्रमाणे यदुराजाने त्या अवधूतास त्याच्या आत्मानंदाचे कारण कोणते असा प्रश्न केला.

क्षीरसागर उचंबळला, कृपेच्या मेघाने गर्जना केली, या प्रमाणे तो अवधूत आपल्या स्वानंदाचे कारण सांगू लागला.

अवधूत म्हणाला, "राजा, ऐक. हे सिद्धांची लक्षणे ओळखणाऱ्या यदुराजा, तू सुंदर आणि उत्तमातील उत्तम प्रश्न विचारलास. धन्य तुझी वाणी. निजानंदकारण तुला यथार्थाने सांगतो."

अवधूत सांगू लागला :-

"हे नृपति, गुरुविना आत्मप्राप्ती कधीही घडणार नाही. आत्मज्ञानासंबंधी विवेक धारण करून मी पुष्कळ गुरु केले आहेत. भूतमात्राच्या ठिकाणी जे जे सद्गुण मी पाहिले, त्या त्या सद्गुणासाठी तो तो गुरु मी केला. स्वतःच्या बुद्धीने त्या गुणांचा मी अंगिकार केला, आणि स्वतःच्याच धैर्याने त्या गुणांची स्वतःचे अंगी धारणा केली.

ह्या धारणेमुळे मी मुक्त झालो असून स्वेच्छेने भटकत असतो. संसार तरून जाण्यास मुख्य साधन ' सद्बुद्धि ' होय. सद्बुद्धि ज्याच्या जवळ नाही त्याला अनंत दुःखे भोगताना उसंत मिळत नाही. सद्बुद्धि ज्याच्या हृदयात नाही, त्याच्या मनात वैराग्य उपजत नाही. ज्याला विवेक नाही तो कोणत्या मार्गाने तरेल ? वैराग्यासह सद्बुद्धि ज्याला सापडली त्याच्या पुढे संसार कोण बापुडा ? या ठिकाणी शिष्याच्या प्रज्ञेचीच आवश्यकता व महत्त्व. ह्या प्रज्ञेच्या बळावर संसार हा मृगजळ बनतो.

ह्या प्रज्ञेच्या बळावर मी ज्याचा जो जो गुण घेतला, तो तो गुरु मी केला असे अपार गुरु मी केले. मला हे संपूर्ण जगच गुरु दिसू लागले. ज्याचा गुण घेतला तो सहजपणे गुरु झाला. पण ज्याचा दोष पाहून, तो त्यागरूपाने गुण घेतला तोही मला, अहित त्यागवृत्तीने गुरुच झाला. ह्या पद्धतीने, गुणग्राहकता आणि दुर्गुण त्याग ह्या समान भूमिकेवरून मला समस्त जगच गुरु दिसावयास लागले. याप्रमाणे पाहिले असता ह्या जगाला गुरुत्व देण्याचे साधन ज्याच्या जवळ असेल तोच परमार्थाचा साधक होतो. हे अचाट सांगताना तुला कसेसेच वाटेल. म्हणून तुला मी ज्याना वरिष्ठ, श्रेष्ठ गुरु मानिले ते सांगतो, ऐक.

माझ्या गुरूंची संख्या २४ आहे. त्यांची नावे १. पृथ्वी. २. वायु ३. आकाश ४. अग्नि ५. जल ६. चंद्र. ७. सूर्य ८. कपोत ९. अजगर १०. समुद्र ११. पतंग १२. मधमाशी १३. हत्ती १४. भृंग १५. हरिण १६. मासा १७. पिंगला नावाची वेश्या. १८. टिटवी १९. मूल २०. कुमारी २१. बाण करणारा लोहार. २२. सर्प २३. कातणी २४. कुंभारीण माशी.

हे राजा, वरील गुरूंच्या ठिकाणी ज्या ज्या वृत्ती घेण्यासारख्या होत्या, त्या मी आपल्याच युक्तीने शिकलो, आणि मग विकल्पभ्रांती सोडून आत्मस्वरूपात स्थित झालो.

हा अवधूत दुसरा तिसरा कोणी नसून साक्षात् श्रीदत्तात्रेयच होते. श्रीदत्तात्रेयांनी यदुराजाच्या मस्तकावर हात ठेवून त्याच्यावर कृपा केली. श्रीसाई अवधूत आपल्या भक्तांवर अखंडपणे कृपा करीत आहेत, शरणागताना त्यांचा नेहमीच आधार असतो.

ॐ तत् सत्.

# गुरु आणि संत

* डॉ. के. भ. गऱ्हाणकर
आग्रा रोड, कुर्ला, मुंबई ७०

**गुरुरूप आणि संतरूप, दोहोंच्या रूपांत विशेषत्व काय ?**

● पायरी प्रतिमा एकचि पाषाण । परि ते महिमान वेगळाले ।

पायरी व प्रतिमा एकाच दगडाच्या करतात, पण त्याचे महिमान वेगवेगळाले असते, तसे संत व इतर माणसे ही सर्व माणसे खरी, पण प्रतिती वेगळाली.

ते चैतन्याचे अलंकार । की ब्रह्मविद्येचे शृंगार । की ईश्वराचे मनोहर । निजमंदिर निवासा । कीं ते भूतदयार्णव । कीं माहेरा आली कणव । ना ते निगुर्णचे अवेव । निजगौरव स्वानंदे ॥ ना. भागवत १–३७।३८.

सज्जनांचे वंदन करिताना श्रीनाथांनी हे वर्णन केले आहे आणि ते त्यांना किती यथार्थ लागू पडते ! प्रभु विश्वरूप झाला, त्याची सत्ता सर्वत्र विखुरली आहे, कोणाला ती भयचकित करते, कोणाला दिङ्‌मूढ करते. त्या चैतन्याचे सर्वांत गोजिरे श्रेष्ठ रूप जीवमात्रांना भेटले असेल तर ते श्रीसंतांच्या रूपाने–म्हणून ते चैतन्याला अलंकाररूप झाले. ब्रह्मविद्येच्या शोधात वेदांपासून अनंत शास्त्रे धुंडत आहेत. येथे वेद मुके झाले ! मन पवन पांगुळले !... त्या ब्रह्माला शब्दाचा साज चढवून जीव-मात्रापुढे साकार करण्याची, शब्दाचा चमत्कार करून दाखविण्याची किमया एक श्रीसंतमायबापांची; त्यांचे जीवन हे ब्रह्मविद्येचे शृंगाररूप होय. याहीपुढे श्रीनाथ संतजीवनाला ईश्वराचे मनोहर निवासस्थान म्हणतात. प्रभु त्याच राऊळात येऊन राहिला, तेथेच केवळ नांदत आहे.

विदर्भात काटेल येथे तारीख १७-९-७६ गोकुळ अष्टमीच्या उत्सवास गेलो होतो. तेथील कचेरी नदी व तिच्या पात्राच्या दोन्ही बाजूस बांधलेले घाट व श्रीसंताची देवालये, नदीत ‘अमृतकुंड’ व तेथेच नदी काठी भव्य कळंब (कदम्ब) वृक्ष, श्री विठ्ठलाचे व मुरलीधराचे मंदिर जणूकाय प्रती द्वारकाच भासत होती. तेथेच या संतांनी विश्वजीवनात कोठे नाही एवढे सुख (आनंद) दिले आणि तेच सुख

जीवमात्रांना वाटले. दात्याची कृपा, जीवमात्राविषयाचा कनवाळुपणा हीच जीवनात अपरिमित सुख मिळण्याची पात्रता होय. ' की ते भूतदयार्णव । म्हणताना शांतिब्रह्म परमदयाळु संत श्रीगुलाबबाबांची मूर्ती डोळ्यापुढे उभी रहाते. सागर बाहेरून शांत दिसावा आणि आत अपरंपार अथांगता असावी तसे श्री गुलाबबाबांचे जीवन आहे.

शिरडी येथील सद्‌गुरु श्रीसाईबाबांच्या नंतर–संत श्री गुलाबबाबांचे दर्शन झाले. त्यावेळेस संत व गुरु ह्यातील फरक उमजला व अनुभविला.

गुरु हे वचन अनेक मार्गातील शास्त्यांना, ज्ञानदात्यांना आहे. त्या सर्व गुरुंचे अखेर श्रेष्ठतेचे रूप म्हणजे सत्ताज्ञानावर नजर नेणे. ज्ञान-प्रभूच्या रूपावर दृष्टि नेऊन त्या सत्तेशी ऐक्य करणे–म्हणजेच मोक्ष देणें. हे गुरुरूप आहे. गुरुत्व किंवा आकर्षक असते ते ज्ञानसत्तेकडे असणे हे भिन्न भिन्न मार्गाच्या गुरुंचे तत्त्वतः रूप आहे.

संतांनीही गुरु हे वचन पुष्कळदा श्रेष्ठ आदराने उच्चारिलेले आहे. पण संत-मार्गातील गुरु हा मोक्षसाधक नसून तो ' संतकुळींचा राजा ' या अर्थाने समजावयाचा असतो. अर्थात् संतवचनातील गुरु हे मोक्षमार्गी असे न म्हणता त्यांना संत याच नावांनी ओळखले पाहिजे. संत व मोक्षमार्गी गुरु यांत आत्यंतिक फरक आहे. संतामुळे प्रभूच्या प्रेमसंसाराला मोहर येतो, तर गुरुच्या बोधामुळे संसार व परमार्थ दोन्ही शून्यत्वाला जातात.

अनंत वस्तुरूपांनी मोहरलेल्या प्रेमसत्तेला गुरु नाशिवंत मानतात. जीवाला जड समजतात व त्या वस्तूंनी, कर्मांनी जीव प्रभूहून वेगळा निघाला असे सांगतात. एका मुखाने ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' म्हणून लागलीच सर्व वस्तू व जीव वेगळे करून ते मायेच्या पाशात अडकले गेले अशी असंबद्ध भाषा ते बोलतात. या उलट संतती प्रियसत्ता कर्म व वस्तुरूपांनी फुलली असे अनुभवितात. ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' हे वचन वस्तूंतही सत्य आहे. वस्तुब्रह्म व जीवब्रह्म यांच्या संयोगात जलावरच्या लहरी खेळाव्या अशी ब्रह्मभोगाची म्हणजे प्रियसुखाची वाढी आहे. ब्रह्म मायोपाधित होत नाही. ते स्वगोडी अनंतरूपांनी भोगते. हाच प्रेमविहार ते सारे विश्व, प्रेमप्रतीति हा जीव व प्रेमकर्म ते विश्व हा संतांचा ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' असा अनुभव आहे.

सर्व वस्तूंतून, कर्मातून जीव-प्रयत्नानें निवृत्ति करून मग ज्ञानाशी ऐक्य होण्याची धडपड ज्यात ते अनंत गुरुमार्ग आहेत. सर्व वस्तु, सर्व कर्में, प्रेम माऊलीचे पालन आहे हा बोध जागा करून वस्तुसकट आईचेच दर्शन भेटविणारे ते संत होत.

मोक्ष म्हणजे रसभावाचा नाश, जीवप्रवृत्तीचा ग्रास व देव व्यक्त नसावा, सर्वशून्य व्हावे अशी कल्पना. त्या समजुतीचा दाता तो गुरु. देवच अंगोअंगी फुलावा, देहच प्रेमकल्लोळरूप भोगावा अशी सशरीर प्रिय-सुखाने डंवरलेली संतरूप होय.

ज्याना कर्मबंधनाचा जाच वाटतो, त्यांना गुरुबोधाने कर्मबंधन वाटणार तरी एवढेच मोक्षाचे कार्य. कर्मबंधन न वाटणे ही त्यांची कृतकृत्यता आहे. मोक्षात कृतकृत्यता आहे. उद्धवाला ही कृतकृत्यता खोटी व मोक्ष कल्पना ठकडी वाटली.

संतरूपात कर्म इवे वाटते; तो प्रियत्वाचा रस असा भेटतो, कर्म कर्मरूपाने उरत नाही. आईचे कर्म म्हणजे शीणरुप-बंधन-नसते. तो प्रियकारंजाचा फवाराच असतो. त्यामध्ये कृतकृत्यता (पुरेपणा) आवडत नाही. बाळाला आई केव्हा पुरी व्हावी ? आईची आत्यंतिक आसक्ति, सर्वांगांनी भेटण्याचा विहार हा प्रियसंतबोधाचा प्रसाद आहे.

जलात सतत डुंबावे, अमृतसागरात अविरत पोहावे, पोहताना त्या अमृताची तहान लागावी व तृषेच्या आर्ततेने अखंड अमृत घोटीत अधिकाधिक रुचीने अमृत लाभावे ही विरहदशा संतगृहात नांदते. देवाची कर्तुमकर्तुं सत्ता मिळावी, का त्या कर्तुमकर्तुं शक्तीशी एकरूप व्हावे हा गुरुमार्गाचा प्रयत्न असतो. संत, कर्मकर्ता प्रभु कर्म हे प्रभूदर्शन असे जाणून ते कर्म प्रभूकडेच ठेवतात. आपण त्याचा अनन्यप्रिय-रस भोगतात. आईने संसार करावा, बालांनी त्याची प्रियरुचि घ्यावी, ही संतदेवांची प्रभुभोगनीति आहे.

देवाला सगुण (म्हणजे प्रियरसरूप) करणे हे संतांचे कार्य. इंद्रिये ही प्रियत्वाची प्रभा असे जाणून त्या प्रेमच गोठलेल्या इंद्रियांतून ते विठ्ठल (प्रियदेव) जागवितात, फुलवितात. जी इंद्रियें, जे जगत सर्व सुखाची खाणी ती गुरूंनी आत्यंतिक विरोधांनी पाहिली, त्यांचा द्वेष केला, देवाचा संसार मोडण्याचा प्रयत्न केला. संतांनी आपल्या वचनांनी, बोधाने देवाला आपल्या प्रियपीठावर उभा केला. श्रीविठ्ठल प्रेमदेवता संतवचनांच्या विटेवर उभी आहे.

मानवी देह प्रियत्वच गोठलेले; त्यातून जीवाला प्रियप्रतीति भेटावयाची. त्याच-प्रमाणे वस्तुरूप व कर्मरूप जगत् प्रियसत्ताच विखुरलेली आहे. जीवाची देहाविषयी जशी बोधदृष्टी तसे सुखाचे विश्व त्या प्रियत्व गोठलेल्या देहातून झरू लागते. याच इंद्रियांत बालावस्थेत अबोध प्रियत्वाने प्रियगोडीने खेळ चाललेला असतो. काम-जागृतीने याच देहातून कामदेवता व्यक्त होते. ज्ञानदृष्टीने हा देह कर्माचा साक्षी

होतो. आनंदात हाच देह आनंदाचा द्रव वहात राहतो. त्याचप्रमाणे हा देह प्रिय-रूप आहे या बोधाने त्यातून-नव्हे तोच प्रियरसाचा कल्लोळ भेटतो.

इंद्रियाप्रमाणेच प्रत्येक वस्तुमागे प्रेमच आवडरूपाने गोठलेले आहे. म्हणून प्रेमकल्लोळ गोठलेल्या इंद्रियांना वस्तू आवडतात. वस्तूंची आवड ही चंद्रकिरणे असून ती प्रियदेहाच्या चंद्रकांताला त्या त्या बोधाप्रमाणे द्रववितात. तेव्हा विश्व हे दिसायाचे बाहेर, व्यक्त व्हावयाचे इंद्रियांत, आणि तेही जी आवड तो देह धरील त्याप्रमाणे. वस्तूंची आवड हेच त्याचे नामरूप. साखर हे नाम त्या साखरेचे आवडीने धरलेले रूप आहे. आवडीने साखरेची जाग देताच म्हणजे आवडीने साखर हे नाव घेताच साखरेची गोडी सगुण होते. कामिनी नामाबरोबर काम सगुण व बालनामासह वात्सल्य याच देहांत सगुण होते. वस्तूंच्या नामोच्चाराने वस्तु गोडी-म्हणजे वस्तुभोग (प्रत्यक्षता); त्याचप्रमाणे आवडीने प्रभुनामाचा उच्चार हीच प्रभुभेटी होय. 'श्रीसाई श्रीसाई' ही आवडीची हाकच सगुण संतांची प्रत्यक्ष भेट आहे.

पतिसंगाने पतिअंग गोड दिसते. त्या गोडीने पतीची सर्व इंद्रियांची पूजा व सेवा होते. पतीची पूजा करण्यात वल्लभेला स्वदेह पतिप्रियरूप भेटतो. तिचा देह देहरूप न उरता पतिरूप होतो.

देह नाशिवंत, देव निर्गुण म्हणून वृक्ष व बीजेही समूळ जाळणारे ते मोक्ष-मार्गी गुरु. पण देवसंगाने देवसेवा व इंद्रिये देवरूप (प्रियरसरूप) करणे हे संतांचे कार्य.

श्रीविठ्ठल देव प्रियरसाची मूर्ती; संत हे त्या प्रियरसाच्या बोधाचे रूप. श्रीविठ्ठलपूजेने प्रियकर्माची पूजा. संतपूजेने इंद्रिये प्रियबोधरूप होतात व प्रिय-सुखाचा विरह वाढवितात. देवपूजेत एक देवरूपच. संतपूजेत प्रियकर्म व प्रियबोध या दोहींची पूर्णता अंगी जागी होते.

संत श्रीगुलाब बाबांनी पूर्वीचे सर्व अध्यात्म व साधनमार्ग अनुभवून ते एका नामभजन प्रेमात विरवून टाकले. इतर साधनांचे त्यांना एका गुरुप्रतीतीत दर्शन घडले, नव्हे श्री गुरुंनी सर्व साधने त्यांच्या पायी लोटांगण घालीत आणली. ध्यान, योग, विरक्ति ही सारी न साधता त्यांना लाभली आहेत. शरीर दंडाच्या साधनांनी साध्य प्राप्त होत नाही; उलट बंधन (दुःखच) वाढते. हे त्यांनी प्रत्येकाला त्याचा उघड अनुभव पटवून सांगितले. इंद्रियांच्या दमनात व इतर साधनाच्या कष्टात जो शीण आहे, तो हरिभजनात नाही. इंद्रियांचे दमन व विषयांचा त्याग हे व्यर्थ,

कठीण—त्या उलट त्याचे श्री हरिकडे अनुसंधान म्हणजे अर्पण हे भागवत धर्माचे मुख्य लक्षण आहे. भक्तीचे महिमान त्यांनी आचरूनच दाखविले.

अंगी एक प्रेमभाव, त्यायोगे प्रभुचा ध्यास किंवा नामस्मरण ( म्हणजेच "गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला।") भजन, कीर्तन अगर सत्संगति यामुळेच केवळ प्रभु वश होतो.

कथा-कीर्तने भोळयाभाळयासाठीं करणे, भक्तिप्रेमाच्या वैकुंठ पंढरीची वारी करणे, मुक्त असून मुलापासून लहान थोर सर्वांचा जाच सोसणे व त्या रीतीने सकल जीवमात्रांना आपल्या भक्तिप्रेमाने जिंकणे, अशी संत श्रीगुलाबबाबांच्या घरची जीवमात्रांना आपलेसे करण्याची उलटी खूण आहे.

मासा सतत पाण्यात, पण पाणी भेटत नाही म्हणून सतत त्याचे ठिकाणी तळमळ. पाण्यातून बाहेर काढताच ते त्याला मरण, तसे प्रभुवाचून मी नाही ही खात्रीही असली, प्रेमरूप प्रभु असे म्हणूनही बरे वाटत नाही, तो भेटावा ही तळमळ रहातेच. तो खरोखरीच सोडून आहे का ? नाही. जीवनाचे व मत्स्याचे ऐक्य आहे—म्हणून विरह आहे, तळमळ आहे. भेटीत तळमळ नाही. प्रभुला वाटत असेल मी ह्याला सोडून नाही. पण जीवाला वाटते की, मीपणाने हरि पहावा. तो मिळून (अव्यक्त) असला तर काय उपयोग ? पाण्यात मासा तसा प्रभूंत जीव ही खात्री—पण सतत भेटण्याची तळमळ.

जीवातील प्रियत्व—प्रभुत्व, प्रियसंयोगित्व भेटण्याची ठिकाणे म्हणजे, श्रीशिरडी शेगाव, काटेल ही संतांनी वसवलेली तीर्थेंच होत. ●


## —श्रीसाईलीला

जगातील सर्वांत स्वस्त सचित्र मासिक

वर्षभर श्रीसाई साहित्याचा आपल्या घरात सुगंध पसरवा

वर्षातून पाच खास अंक

वा. वर्गणी ६ रु. [ट. ह. सह]		किं. ६० पैसे

# भगवान श्रीदत्तात्रेयाचे अलिकडील अवतार श्रीअक्कलकोट स्वामी

* श्रीभगवान दत्तात्रेययांचे द्वितीय अवतार श्रीनृसिंह सरस्वती यांचे अवतार किंवा साक्षात श्री नृसिंह सरस्वती म्हणजेच पूर्णब्रह्म भगवान श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोट हे होत अशी श्री दत्तभक्तांची गाढ श्रद्धा आहे. इ. स. १८५७ च्या सुमारास अक्कलकोटच्या आध्यात्मिक क्षितीजावर अखिल विश्वाचा आभास मावळून टाकण्यासाठी श्रीस्वामी दत्तस्वरूपात प्रगट झाले. अक्कलकोट येथे त्यांनी २३ वर्षे



श्रीसद्‌गुरु स्वामी महाराज, अक्कलकोट

वास्तव्य केले व आपल्या सामर्थ्याने अनेक लीला व चमत्कार करून दाखविले. अक्कलकोटी प्रगट होण्यापूर्वी श्रीस्वामी समर्थ १८३८ साली मंगळवेढे येथे होते. पण

तिथे ते कोठून आले हे निश्चितपणे सांगता येत नाही. तिथे ते १२ वर्षे होते. १८५० साली त्यांनी मंगळवेढे सोडले व ते पंढरपूर मार्गे मोहोळास आले. तिथे ते ५ वर्ष राहिले. आपल्या प्रत्येक वास्तव्यात त्यांनी आपल्या अचाट सामर्थ्याने जनतेची दुःखे दूर केलेली आहेत. त्यांनी आपल्या भक्तगणांना दत्तरूपात दर्शन दिले व सत्यधर्माचा प्रसार-प्रचार केला व पाखंड्याना योग्य तो धडा शिकविला. श्रीस्वामींनी आपल्या हयातीत अनेक थोरामोठ्यांना दर्शन दिले त्यामध्ये अनेक तत्कालीन संस्थानिक होते. क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांनाही स्वामींचे दर्शन लाभले होते. अक्कल-कोट ही स्वामींची लीलाभूमी असल्याने तिथे श्रीसमर्थांचे अवतारकालीच स्थापन झालेल्या पादुका आहेत, तसेच आज महाराष्ट्रात सर्वत्र स्वामींचे मठही आहेत. शक संवत १८०० म्हणजे इ. स. १८७८ च्या चैत्र वद्य त्रयोदशीस मंगळवारी दुपारी ४ वा. श्रीस्वामी सद्गुरुंच्या स्थूल शरीराचे नयन कायमचे बंद झाले. ●

..............


वर्षातून पाच खास अंक प्रकाशित करणारे

मराठीतील एकमेव मासिक श्रीसाईलीला

१) रामनवमी विशेषांक

२) श्री दत्तगुरू विशेषांक

३) श्री पुण्यतिथी विशेषांक

४) दिवाळी भक्त स्वानुभव विशेषांक

५) श्रीसाई काव्यबहार विशेषांक

वार्षिक वर्गणी अवघी सहा रुपये (ट. ह. सह)

# प्रभू श्रीदत्तात्रेय महाराज व त्यांचे (२४) शिक्षा गुरु

● डॉ. अनिल जायस्वाल
द्वारा श्रीसाई क्लिनिक, चितार ओळ, नागपूर २.

**वाचकांनो !**

● श्रीदत्तात्रेय भगवंतास एकंदर २४ गुरु होते, ही आख्यायिका आपणसुद्धा ऐकलेली असाल. परंतु काय हो ! एकाच वेळी कोणा एकास एकूण २४ गुरूंची आज्ञा वा उपदेश शिरसावंद्य करणे शक्य तरी आहे काय ?

होय ! आपण माना अथवा न माना. परंतु हे अस्खलीत सत्य घडून चुकलेले आहे.

आपणास तर बुवा निव्वळ एकाच गुरूच्या वचनांतर्गत राहणे अशक्य झालेले आहे. शिर्डीच्या वारीपुरतेच आपण अंशतः साईभक्त म्हणविण्याच्या लायकीचे. हीच आपली पात्रता. हीच आपली केविलवाणी स्थिती. आणि तेही श्री साई समर्थांचे एखादे तरी वचन कृतीत उतरविण्यास—आपल्या नाकी नऊ येते. याउपर आपण एक फार मोठी कामगिरी उत्कृष्टतेने बजावली– हा अभिमान आपणास चिकटून असतोच. म्हणूनच की काय आपण श्री साईमंदिरात जाताना देखिल सरळ ताठ मान करून, मुळीच न वाकविता, जातो.

आपली दीन अवस्था खरी,
परंतु दीनभाव मुळीच उपजत नाही.

मग तो दीनानाथ तरी काय करणार ? कोणास शब्द बोचले असल्यास–लेखक क्षमाप्रार्थी आहे. परंतु लेखकाने स्वतःची व्यक्तिगत–काय ती वस्तुस्थितीच –आपणासमोर मांडलेली आहे. असो.

परंतु प्रभू श्रीदत्तात्रेय महाराजांना एकूण २४ गुरु होते–ही गोष्ट सर्वतोपरी अक्षरशः शंभर टक्के सत्य व निर्विवाद आहे. यास आपल्या पुरातन भारतीय संस्कृतीचे विविध धार्मिक ग्रंथ व अनेक शास्त्रपुराणे दुजोरा देतात. आता ते गुरु कोणते व त्यांचा उपदेश काय ? याविषयीच आपण या पवित्र–पावन समयी विचार करू या.

दीक्षा-गुरु एकच असतो.
परंतु शिक्षा गुरु अनेक असू शकतात.

श्रीदत्तात्रेय महाराजांनी कोणत्या 'शिक्षा गुरू' पासून काय बोध घेतला व काय अंगिकृत केले, हे खाली दिलेले आहे.

## १ भू-देवता

श्रीदत्तात्रेयांच्या अनेक गुरुंपैकी 'भूमाता' ही एक आहे. नवप्रभात समयी ते न चुकता तिला वंदन करायचे.

आपले बाहु क्रियात्मक शक्तीचे प्रतीक आहेत. आपण निश्चय करा की ईश्वरास आवडतील तसेच प्रिय कृत्य आपण या हाताद्वारे करू. "धरणी-माते! तू सदैव माझी रक्षा कर व माझ्या द्वारे सुकृत्यच घडू दे. पंचमहाभूतांद्वारे रचलेले हे शरीर शेवटी अंशतः तरी तुझ्यातच विलीन होणार आहे. तू तर सर्व काही सहन करूनही आम्हा सर्वांस सुखच देत असतेस."

वाचकांनो! श्री सद्गुरू कबीराने देखिल धरतीमातेचे माहात्म्य जाणून खालील ओळी उद्घोषित केल्या होत्या. त्या कदाचित नभोवाणीवरून ध्वनिक्षेपित करताना आपण ऐकलेच असाल :—

"माती कहे कुंभारसे।
तूं क्या रोंदे मोहे ॥
इक दिन ऐसा आयेगा।
मैं रौंदूंगी तोहे ॥"

भूमातेपासून श्री दत्तप्रभूने सद्भाव व सहनशक्ती अंगिकृत केली.

## २ वायु

वायुपासून महाराजांनी संतोष आणि निःसंगतेचा धडा घेतला. मंदगतिने वाहणाऱ्या वाऱ्यापासून मन कसे प्रफुल्लित व दोलायमान होते. तसेच श्रीदत्त-गुरूंच्या सानिध्यात आल्यावर मानवी मन लय-बद्ध तालाने हेलकावे घेऊन नृत्य करू लागते. मनाची एकाग्रता वाढून समाधिस्थ होणे सुलभ होते.

## ३ आकाश

आकाशासारखाच आत्मा सुद्धा अनादि व अविनाशी आहे. ईश्वर आकाशा-प्रमाणेच सर्वव्यापी आहे.

## ४ जल

पाण्यापासून महाराजांनी शीतलता व मधुरतेचा उपदेश घेतला. जलाप्रमाणे साधकाने सुद्धा शुद्ध राहणे अत्यावश्यक आहे. शीतल स्वभाव व मधुरभाषी असणे साधकांस अनिवार्य आहे.

## ५ अग्निदेवता

अग्निपासून त्यांनी पवित्रतेचे शिक्षण घेतले. हृदयात जर विवेकरूपी अग्नि साठविलेला असेल तर पाप मुळीच शिरकाव करू शकणार नाही. विवेकच अग्नि आहे. कोणाचाही दुर्व्यवहार मनात ठेवू नका. इतरांचे पापकृत्य मनातून पूर्णतः काढून टाका. तिकडे लक्षच देऊ नका. लक्ष जर गेलेच तर त्यास निःसंकोच विवेक-रूपी अग्निद्वारे भस्मीभूत करा.

## ६ चंद्र

चंद्रापासून महाराजांनी क्षमता शिकली. वृद्धी व ऱ्हास हे तर या देहाचे होत असतात. आत्म्याचे नाही. श्रीमंतीत व्यर्थ अवडम्बर व गर्व नको आणि विपत्तीत दुःख व मत्सरही नको.

## ७ सूर्य

सूर्याप्रमाणे परोपकारी होण्याचा धडा श्रीदत्तप्रभूंनी घेतला. अभिमानरहित परोपकारी जीवन साधकांनी जगावे. सूर्य हा एकच असताना त्याचेच प्रतिबिंब वेग-वेगळ्या जलाशयात न्याहाळल्यास तोच आपणास अनेक असल्याचा भास होतो. त्याचप्रमाणे विविध देहादि-उपाधि कारणास्तव, आत्मासुद्धा एक असूनही अनेक नाना स्वरूपाचा जाणवतो. हाच मानवाचा भ्रम आहे. एकालाच तो अनेक समजू लागतो हेच त्याचे अज्ञान आहे. वास्तविक आत्मा हा उपाधिरहित आहे. करिता अनेकांना एकच समजण्याचा प्रयत्न करा.

सर्वांना समदृष्टीने न्याहाळा व अभिमानरहित परोपकारी जीवन जगा.

## ८ कबूतर

कबुतराच्या घटनेद्वारे महाराजांनी हाच धडा घेतला की कोणत्याही व्यक्ती वा वस्तूविषयी मुळीच आसक्ती बाळगू नका. तो तर पत्नी व पुत्राच्या आसक्तीतच मेला. कोणाचाही मृत्यु झाल्यावर शोकग्रस्त होऊ नका; आक्रोश करू नका-रडू नका. रडणाराही स्वतः एखाद्या दिवशी जाणारच आहे.

रडावयाचेच झाल्यास स्वतःकरिता रडावे.
दुसऱ्याकरिता का म्हणून रडावे !

साधकाने सदैव आसक्तीरहित जीवन जगण्याचा प्रयत्न करावा.

### ९ अजगर

अजगराप्रमाणे प्रारब्धानुसार जे काही मिळत आहे, त्यातच आपण संतुष्ट राहणे हितप्रद आहे.

### १० समुद्र

समुद्र काही वर्षाऋतूत भरती आल्यावर आपली मर्यादा ओलांडीत नाही. उलटपक्षी ग्रीष्मऋतूत वा उन्हाळ्यात वाळतही नाही. साधकाने सुद्धा सुखःदुखात समुद्राप्रमाणे स्थिर राहणे अत्यावश्यक आहे. समुद्राप्रमाणेच सदैव विशाल मनाचे होण्याचा सतत प्रयत्न करा.

शब्दविषया भुले **हरिण** ।
अंती वेची आपुला प्राण ।
स्पर्श विषया सेली **वारण** ।
साहे आकर्षण अंकुशें ॥ ९० ॥
रूपविषयां भुले **पतंग** ।
जाळूनि निमे आपुलें अंग ।
**मीन** भोगी रसविषयभोग ।
मुके सवेग प्राणास ॥ ९१ ॥
गंधालागी होऊनि गुंग ।
कमल कोशी पडे **भृंग** ।
एकेका पायी इतुका प्रसंग ।
पाचांचा संघ भयंकर ॥ ९२ ॥

( अध्याय ३९ श्री साईसच्चरित )

### ११ हरिण

संगीत–श्रवणाच्या लालसेने हरिण सुद्धा धावत-पळत शेवटी वधिकांच्या तावडीत सापडतो व प्राणास मुकतो. करिता श्रवणेन्द्रियांवर ताबा ठेवणे साधकांच्याच हिताचे आहे— हीच शिकवण श्रीदत्तमहाराजांनी अरण्यातील एका आकस्मिक घटनेद्वारे घेतली.

## १२ वारण ( गज; हत्ती )

नकली हत्तीणीच्या स्पर्शसुख लालसेने उताविळ झालेला हत्ती शेवटी गवताद्वारे आच्छादिलेल्या खड्यात नेमका पडतो व शिकारी लोकांच्या तावडीत सापडतो.

" पदापि युवती भिक्षुर्न स्पृशेद् दारवीनपि ।"

अर्थात शास्त्राप्रमाणे पुरुष साधकास व स्त्रीसाधकांस परस्परांचे स्पर्श वा आलिंगन वर्ज्य व निषिद्ध आहेत.

## १३ पतंग

अनेक गुरुंपैकी पतंग सुद्धा महाराजांचा एक गुरु आहे. अग्नी द्वारे मोहित व आकृष्ट झाल्यावर तो त्याच्याकडे आसक्तीवश धाव घेतो व परिणामस्वरूप जळून खाक होतो. मानव सुद्धा या मायेच्या पायी मोहास बळी पडून फसतो आणि सरतेशेवटी आपल्या सर्वनाशास स्वतःच कारणीभूत होत असतो. साधकाने सौंदर्यापासून सदैव अलिप्त असावे. त्यास फक्त न्याहाळावे, परंतु कधीही आसक्त होऊ नये. याविषयी श्री साईसच्चरितातील श्री बाबांनी म्हटलेल्या खालील ओळी लक्षवेधक आहेत.

" नाना किमर्थ गडबडसी मनीं ।
ज्याचा निजधर्म तो स्वस्थपणीं ।
आचरतां आड यावे न कोणी ।
कांहीं न हानी तयांत ॥ १५८ ॥
ब्रम्हदेव सृष्टी रचिता ।
आपण तयाचें कौतुक न करितां ।
व्यर्थ होऊं पाहील रसिकता ।
' बनतां बनतां बनेल ' ॥ १५९ ॥
असतां पुढील द्वार उघडें ।
जावें कां मागील द्वाराकडे ।
एक शुद्ध अंतर जिकडे ।
तेथें न सांकडें काहींही ॥ १६० ॥
कुढा भाव नाहीं अंतरीं ।
तयास काय कोणाची चोरी ।
दृष्टि दृष्टीचें कर्तव्य करी ।
भीड मग येथें धरिसी कां ॥ १६१ ॥" (अध्याय ४९)

सौंदर्यामागे वेडा होणाऱ्याचे अहितच होत असते. विषयांचे सौंदर्य केवळ बाह्यता व अस्थायी आहे. आंतरिक मुळीच नाही. म्हणूनच सौंदर्यपानाचा आनंदही क्षणिक व अस्थायी आहे. साधकाने त्यामागे मुळीच लुभावु नये.

सौंदर्य पहावयाचेच असेल तर त्याचे पहा जो एक असूनही वेगवेगळया स्वरुपात दृष्टिगोचर होतो—आणि असा तो—

साक्षात ईश्वर आपणास साई स्वरूपात प्रारब्धानुसार लाभलेला आहे. साई-समर्थाच्या सौंदर्यात रममाण व्हा. त्यांचे सौंदर्यच सर्वतोपरी पूर्ण व परम सुखदायी आहे. त्यांच्याशी प्रेम करताना, त्यांचे सौंदर्य न्याहाळताना–साधकाने देहभान हरप-ल्यास–त्यास चिरस्थायी व अखंड परमानन्दाची प्राप्ति होणे शक्य आहे.

## १४ मीन (मत्स्य)

रसस्वादनेच्या लालसेने हपापलेला मासा शेवटी काट्यात फसतो. परिणाम-स्वरुप तो सुद्धा प्राणास मुकतो. हीच जिव्हा मानवासही सदैव त्रस्त करीत असते. नेहमी रुचकर स्वादिष्ट पदार्थांच्या सेवनात निमग्न असणारी जिव्हाच जर काबूत आली नसेल तर मानव पूर्णतः जितेन्द्रिय कधीच संबोधला जाऊ शकत नाही. जो रसनेस जिंकतो, तोच सर्वस्वास जिंकू शकतो.

आपली साईमाऊली देखिल,

पुरवी न रसनेचे लाड ।
मिष्टान्नाची न धरी होड ।
प्राताप्रास धडगोड ।
त्यांतचि गोड मानी तो ॥ ९९ ॥

—(अध्याय २३ श्रीसाईसच्चरित)

मिळाले तरी वाहवा, नाही तरी वाहवा, असेच ते राहावयाचे.

जीतं सर्वं जिते रसे ।

## १५ भृंग

मधुकृत अर्थात भृंग वा मधमाशी. भमराच्या आसक्तीकडे न्याहाळा. तो लाकडात छिद्र करण्याचे सामर्थ्य बाळगतो खरे. परंतु उलटपक्षी नाजूक कमळाच्या पाकळीशी आसक्त असल्याकारणास्तव त्याचेसाठी तो आपले प्राणसुद्धा त्यागावयास सदैव तत्पर असतो. ज्याप्रमाणे कठीण लाकडात छिद्र करू शकणारा भ्रमर आसक्ती

वश कमळास काहीच करू शकत नाही त्याचप्रमाणे विषयवासनेत गुरफटलेल्या मानवाचे आयुष्य व्यर्थ जाते.

"आसक्तित्यागानेच नराचा नारायण होऊ शकणे शक्य आहे."

श्रीभगवान दत्तात्रेयांनी याप्रमाणे शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध या पाचही विषयांची चर्चा केली. मृत्योपरात ऐकविल्या जाणाऱ्या 'गरूड पुराणांत' म्हटलेले आहे :–

कुरङ्गमातङ्गपतङ्गमृङ्गमीना हता पंचभिरेवपञ्च ।
एकः प्रमादी स कथं न हन्यते यः सेवते पञ्चभिरेवपञ्च ॥

अर्थात पतंग, हत्ती, हरिण, भ्रमर, व मासा जर एकेकाच विषयांच्या आसक्तीपायी प्राण गमवितात तर या पाचाही विषयांत गुरफटलेल्या व त्यांना उपभोगिणाऱ्या प्रमादी मानवाचे काय हाल होत असतील ?–याचा पाठकांनीच (वाचकांनीच) विचार करावा'.

अहो ! हे मरणोपरांत ऐकविल्या जाणारे
गरूडपुराण तर मृत्युपूर्वीच ऐकविल्या
गेले पाहिजे, जेणेकरून मानव अंशतः
तरी सावध होऊ शकेल. असो.

## १६ मधमाशी

श्रीभगवान दत्तात्रेयांनी मधमाशीपासून धडा घेतला की कोणतीही वस्तु अतिशय प्रमाणात संग्रहित करणे हानिकारक आहे. अति तेथे माती. या लोभामुळेच मधमाशी आपला प्राण गमावून बसते. त्यांच्याद्वारे संग्रहीत झालेला मध शेवटी शिकारी घेऊन जातो. अलीकडचे सुद्धा याच्या त्याच्या नावाने बँकेत खाते उघडतात. अमाप संपत्ति जमवितात व शेवटी बहुतांशी ते 'हार्ट फेल' नेच दगावतात. संपत्ति कोणाची व मजा कोण करतो !

योगी सुद्धा भोगी बनून शेवटी रोगी बनू शकतो.

संग्रहित करण्याऐवजी सुपात्रास दान करा. पुण्य कमवा.

## १७ वेश्या

आश्चर्य नको. श्रीदत्त महाराजांच्या अनेक शिक्षा गुरूपैकी एक गुरू, पिंगला नामक वेश्या होती.

'आसक्त व दिखाऊ शिष्यापेक्षा वेश्याच लाखपटीने बऱ्या'... हे मर्म त्यांना कळलेले होते. त्या वेश्येने असा संकल्प केलेला होता की कामी पुरूषांची वाट बघण्याऐवजी फक्त ईशचिंतन करीत केवळ त्यांचीच प्रतीक्षा का बरे करू नये? त्यानंतर उरलेले आयुष्य तिने ईशप्रसन्नतेसाठी ईशचिंतनातच गमविले.

ग्रस्तं कालाहिना ऽ त्मानं को ऽ न्यस्नातुमधीश्वरः । अर्थात कालसर्पांचा ग्रास असणाऱ्या जीवात्म्याची रक्षा ईश्वराशिवाय दुसरा कोण बरे करू शकतो ? हे त्या पिंगला नामक वेश्येने ओळखले असावे.

आशा ही परम दुखं नैराश्यं परम सुखं । आशेची साखळी मानवास कुठपर्यंत जखडून ठेवते याचे वर्णन स्वामी श्रीशंकराचार्यांनी खालीलप्रमाणे केलेले आहे :–

अंगं गलितं पलितं मुंडं दशनविहिनं जातं तुंडम ।
वृद्धो याति गृहित्वा दंडं तदपि नं मुंचत्याशापिंहम् ॥

अर्थात– शरीर गळून राहिले,
केश श्वेत झालेत,
दांत पडलेत,
अशक्तीवश काठीचा सहारा
घेऊन चालणारा म्हातारा,
अद्याप 'आशे'च्या तावडीतून
मुळीच सुटलेला नाही.

त्यापेक्षा ईश्वराचे नाम आपण आतापासून घेतलेले बरे.

## १८ कुरर (टिटवी)

टिटोडी वा टिटवी पक्ष्याप्रमाणे संग्रह करण्याऐवजी त्याग करणे श्रेष्ठ आहे.

## १९ बालक

साधकास सदैव बालकाप्रमाणे भोळे व निर्दोष राहणे अनिवार्य आहे.

## २० एकांतवास

साधकास कोणतीही साधना एकांतवासात केली पाहिजे. बाह्य एकांतापेक्षा आंतरिक वा मानसिक एकांतवास जास्त महत्त्वाचा आहे.

## २१ लोहार

श्रीदत्तात्रेय प्रभुंनी धनुष्यबाण बनविणाऱ्या त्या लोहारास सुद्धा आपल्या शिक्षा गुरूपैकी एक मानले; जो आपले काम करताना इतका तन्मय व निमग्न झालेला आहे की जवळूनच राजेसाहेबांची सवारी चाललेली आहे—हे सुद्धा त्याच्या ध्यानीमनी नाही. कोणत्याही कार्यात इतक्या तीव्रतेची तन्मयता असणे अत्यावश्यक आहे की–काम करणारा त्यात इतका गर्क झाला पाहिजे की—सभोवतालचे वातावरणच काय तर तो देहभान सुद्धा विसरला पाहिजे. लौकिक कार्यातही तन्मयतेशिवाय सिद्धी प्राप्त होऊ शकत नाही. तर मग पारलौकिक कार्यात व ईश्वर आराधनेत तन्मयतेशिवाय सिद्धी कशी काय प्राप्त होणार ?

ध्याता, ध्यान व ध्येय
हे जेव्हा एकरूप होतात,
तेव्हाच जीव कृतार्थ
होऊ शकतो.

## २२ सर्प

सर्पाची चालच निराळी. सरळ कधी जाणार नाही. तो आपल्या लहरीतच. आपल्याच गुंगीत. एकटाच इकडे तिकडे भटकणारा. त्याची धुंदच जगावेगळी. याचप्रकारचे वर्तन साधकाकडून सुद्धा अपेक्षित आहे.

## २३ कातिन

कातिनीस पहा. आपल्या तोंडाद्वारे गाळलेल्या लाळेशी ती जाळे विणते. लाळेशीच ती खेळते व कित्येकदा लाळेसच ती पुन्हा गिळंकृत करते. ईश्वरसुद्धा आपल्या मायेद्वारे या सृष्टीचे सर्जन करतो व शेवटी संहारकर्ताही तोच आहे. करिता कातिनीचासुद्धा श्रीदत्त भगवंतांनी आपल्या शिक्षा गुरुंच्या मालिकेत समावेश केला.

## २४ कीटक

कीटक सुद्धा त्यांचा गुरु. भंवरी त्या कीटकास धरून बिळात नेऊन कोंडते. तो बिचारा भंवरीच्या भीतीने सतत तिचेच चिंतन करीतो आणि शेवटी एक वेळ अशी येते की तो स्वतः भंवरी बनूनच बाहेर पडतो. या संदर्भात श्री साईसमर्थांचे बोल आपल्या 'वणजारि' गुरु विषयी (अध्याय ३२ श्रीसाईसच्चरित–ओळ ६७ ते ९७) लक्ष वेधक आहेत. त्यांच्या त्या गुरुने देखिल त्यांना विहिरीत लोंबत ठेवले

होते. सरतेशेवटी ' दृढ निष्ठा व सबुरी ' मुळेच श्रीसाईबाबा पण ' सद्गुरु वा देवाधिदेव ' झालेत.

अशाप्रकारे आपल्या निरनिराळ्या चोविस गुरुंपासून श्री दत्तात्रेय महाराजांनी शिक्षण घेऊन ते सर्व आचरणात आणलेत. श्री साईसमर्थांनी सुद्धा वरील सर्व शिकवण अंगिकृत केलेली होती. म्हणूनच श्रीसाईबाबांना आपण ' श्री दत्ता अवधूता " असेही संबोधितो.

कित्येक वेळा बाबा क्रोधित व्हावयाचे. परंतु आई कधी मुलांवर रुसते काय ? कधीच नाही. रुसते ते मूल. कधीच रुसत नाही, ती माऊली. त्यांचा राग हा केवळ वरूनच असायचा.

"फटाटोपो भयंकरः "

अर्थात त्यांचा क्रोध केवळ ओठापुरतचा असायचा. पोटात नसे. हृदयात सर्वां-विषयी तोच वात्सल्य भाव, तीच ममता. मुलाचे एखादे चुकीचे. वर्तन पाहून आई-सुद्धा रागावते. परंतु मुलगा सन्मार्गावर चालावा हीच तिची आंतरिक इच्छा असते. म्हणूनच तिचे हे फुसकारणे–हा देखावा. अंतरंगात तर वात्सल्याचा सागर उमळत असतो.

करिता

साईच आपुली माऊली
व साईच श्री दत्तात्रेय ।

खरंच आहे: —

कोणी नसे त्राता, समर्था
तुजविण आतां साईनाथ ॥ धृ० ॥
यत्न मानवी सरती जेव्हा ।
तारिल सद्गुरु एकचि तेव्हा ।
तव चरणी माथा, समर्था ॥ १ ॥
साईदत्ता–दिगंबरा ।
साईनाथा–दत्तात्रया ॥

# दोन अवतार

● श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
ताडदेव रोड, मुंबई ४०० ००७.

● भारतामधील व विशेषतः महाराष्ट्रामधील जनतेचे दैव इतके भाग्यशाली आहे की तेथे आतापर्यंत अनेक अवतार होऊन गेले. किंबहुना ही भूमिच अवतारांची आहे असे म्हटल्यास अतिशयोक्तिचे होणार नाही. ह्या सर्व अवतारांचा अभ्यास केला असता एक गोष्ट प्रामुख्याने आढळून येते की कोणत्याही अवतारी पुरुषाने आपण अमुक एका देवाचा अवतार आहो असे कधीच कोणास सांगितले नाही, किंवा तशी अप्रत्यक्ष जाणीवही कोणाला करुन दिली नाही. त्या त्या काळच्या जाणत्या लोकांनी लिहून ठेवलेल्या ह्या अवतारी पुरुषांच्या जीवन चरित्राचा आढावा घेताना त्यातून मिळणाऱ्या संदर्भावरून आणि अनुमानावरून चरित्र-नायकांची ओळख करून घेऊन त्यांची योग्यता जाणावी लागते व ते कोण होते हे ठरवावे लागते. इतर अवतारांप्रमाणेच श्रीस्वामीसमर्थ, अक्कलकोट व श्रीसाईबाबा, शिरडी ह्यांनीही आपण कोण आहोत हे कधीच स्वमुखाने कोणास सांगितले नाही, उलट ते कळू न देण्याचीच खबरदारी घेतली.

अवतार घेण्यामागे परमेश्वराची निश्चित योजना असते, विशिष्ट हेतू असतो, ह्यात शंका नाही. आतापर्यंतच्या संतांचा व अवतारांचा इतिहास हेच सांगतो. प्रत्येक अवताराने आणि संताने काहीतरी महत्त्वाचे कार्य केलेले आहे असे पुरावे सापडतात. प्रत्येक व्यक्तीप्रमाणेच प्रत्येक अवतारी पुरुषाची त्याच्या कार्यानुसार कार्यक्षेत्रे व कार्यपद्धतिही वेगळाली असतात. तथापि बऱ्याचशा संतचरित्रांचे अवलोकन केले असता त्यांच्यामधील साम्यस्थळे व समान गुणधर्म चटकन् नजरेत भरल्याविना राहत नाहीत. आजच्या लेखात दोन महान् दत्तावतारी पुरुष श्रीस्वामीसमर्थ, अक्कलकोट व श्रीसाईनाथ, शिरडी ह्यांच्या बाबतीतील समान गुणवैशिष्ट्ये भक्तांना मनोरंजक तसेच उद्बोधक वाटतील अशी आशा आहे.

श्रीक्षेत्र शिरडी येथे ज्या काळी (म्हणजे १८५७ च्या सुमारास) श्रीसाईबाबा उदयास आले. त्याच सुमारास श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे श्रीस्वामी समर्थ प्रगट झाले. ह्या दोन्ही अवतारी पुरुषांच्या जन्मस्थानांविषयी, मातापितरांविषयी, बालपणाविषयी व जातीधर्माविषयी निश्चित माहिती कोणालाही मिळू शकलेली नाही. देहरूपे वावरत

असताना यासंबंधीची माहिती प्रत्यक्ष त्यांच्या मुखातून ऐकावयास मिळावी म्हणून त्यांच्यानिकट रात्रंदिवस वावरणाऱ्या भक्तांनी प्रयत्नांची शिकस्त केली, पण त्यांनी कोणालाहीं थांगपत्ता लागू दिला नाही. श्रीस्वामी समर्थ आनंदात असताना 'आपण कोण' म्हणून प्रश्न केल्यावर 'दत्तनगर मुळपुरुष', 'वडाचे झाड' असे उद्गार काढीत. तसेच श्रीसाईबाबांची एकदा एका कमिशनपुढे साक्ष झाली असता 'मला साईबाबा म्हणतात', 'धर्म कबीर', 'वय लाखो वर्षे' अशा प्रकारची उत्तरे त्यांनी दिली होती.

दिव्य कांति, तेजःपुंज शरीर, आजानुबाहू हे वर्णन ह्या दोन्ही अवतारी पुरुषांना तंतोतंत लागू पडत होते. त्यांचे तेज इतके प्रखर होते की त्यांचेकडे एकसारखी दृष्टी लावून कोणालाही पाहवत नसे. श्रीस्वामी समर्थ फक्त एक लंगोटी नेसत, अथवा त्यांस नेसवीत असत. श्रीसाईनाथांचा पोशाखही अत्यंत साधा व तोही फाटकातुटकाच असे.

'तेथूनि मग निश्चय केला । पोशाख अवघा बाबांनी बदलला ।
कफनी ओढिली लंगोट लाविला । फडका गुंडाळिला माथ्यासी ॥
(श्री सा. स. अ. ५)

श्रीअक्कलकोटच्या महाराजांचे दर्शन म्हणजे एक मोठे दिव्यच असे. दर्शनाला आलेल्यांच्या पापकर्मांची त्यांच्यासमोर तेव्हाच झाडणी होई. वेळप्रसंगी ते गालीप्रदानही करीत. महाराजांच्यासमोर राजा व रंक दोन्ही सारखेच होते. अक्कलकोटचे न्यायाधीश, मामलेदार, फौजदार, फार काय खुद्द राजेसाहेब ह्यांसही श्रीमुखात खाण्याचे प्रसंग येत असत. डोकीचे पागोटे काढून लांब फेकून देणे, शिव्या देणे वगैरे महाराजांचे खेळ हमेशा चालावयाचे. पण कोणाची बिशाद नसे की महाराजांपुढे कोणी ब्र काढेल किंवा केलेल्या हुकूमाची अवज्ञा करील. महाराज शतशः विपरीत गोष्टी करीत, पण त्यांचे परिणाम मात्र चांगले होत असत. श्रीसाईबाबांचा मार्ग परोक्ष, तडकाफडकी व रोखठोक होता. कोणताही मनुष्य त्यांच्यापुढे येवो, मग तो सुशिक्षित असो वा अशिक्षित, अहंमन्यतेच्या न्यूनगंडाने पछाडलेला असो वा साधाभोळा, श्रीबाबांकडे तो एकदा आला, श्रीबाबांची व त्याची दृष्टादृष्ट झाली, की तो लीन होत असे. त्यानंतर श्रीबाबा असे काही संदिग्ध बोलत की त्या बोलण्याचा अर्थ किंवा उद्देश तेथे उपस्थित असलेल्या इतर कोणाही व्यक्तिच्या तर ध्यानी येऊ नये, पण ज्या व्यक्तिस उद्देशून त्यांचे बोलणे असेल, त्या व्यक्तिला ते मनोमन पटावे. पुष्कळदा बोलण्यापेक्षा ते अशा काही घटना घडवून आणीत, की त्यातून त्या व्यक्तिला अचूक अर्थबोध किंवा मार्गदर्शन होत असे.

श्रीस्वामीसमर्थ गावात वाटेल तिकडे हिंडत असत व वाटेल तेथे बसत. लहर लागेल त्याप्रमाणे वाटेल त्याचे घरी अन्नग्रहण करीत. ब्राह्मण, शूद्र, वैश्य व यवन या सर्वांस ते सारखेच मानीत. जातीपेक्षा भक्ति महाराजांस जास्त प्रिय होती. श्रीसाईबाबांची स्थितीसुद्धा सुरुवातीला अशीच होती. ते कधी ओढ्यावर जाऊन बसत. कधी गावकुसाजवळील लिंबाखाली बसत. कधी कोणाच्या मळ्यात जाऊन बसत; अंगावरील कपडे फाटके असत, कधी प्रसंगानुरुप उग्रावतार धारण करीत. या व अशाच तऱ्हेवाईक वागण्यामुळे साधारण जनसमाजाला ते वेडे वाटत. पण लौकरच लोकांचा भ्रम दूर झाला व त्यांची योग्यता शिर्डीच्या लोकांना कळून आली.

श्रीअक्कलकोटचे महाराज दत्तावतार आहेत असे त्यांचे भक्तच म्हणत असे नाही. मोठमोठे योगी, सिद्ध व तापसी हे महाराजांची कीर्ति ऐकून दर्शनास येत व महाराज अवतारी असल्याबद्दल खात्री करून घेऊन सामान्यजनांस तसा उपदेश करून जात. आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वती व यशवंतराव महाराज, देव मामलेदार, मूर्तिपूजा निषेधक ब्रम्हवेत्ते वेदोक्त प्रकाशाचे कर्ते विष्णुबोवा ब्रम्हचारी ह्या थोर पुरुषांचा ह्यात समावेश होता. शिरडीचे सामान्य लोक श्रीसाईबाबांना 'वेडे फकीर ह्या नावाने संबोधित असता, संत देवीदास, जानकीदास, गंगागीरबाबा, आनंदनाथ-महाराज वगैरे श्रेष्ठ पुरुषांनी त्यांची किंमत ओळखून त्यांच्या योग्यतेची जाणीव त्या वेळच्या लोकांना करून दिली होती.

श्रीस्वामीसमर्थ अवतारी असल्याने काही लोकांची त्याकाळी अशी रीत असे की, आपले जे उपास्य दैवत असेल त्याची प्रतिमा अगर गीता अगर सप्तशति वगैरे जी पोथी आपणास वाचावयाची असेल ती प्रथम महाराजांचे हाती देऊन त्यांचे हातून प्रसाद म्हणून घेऊन मगच पूजनास अगर वाचनास आरंभ करावा. महाराज हात लावून पोथी अगर प्रतिमा देत. जवळ-जवळ हीच प्रथा श्री साईनाथांच्या वेळेस शिरडीत होती व अद्यापही त्यांच्या समाधिला वस्तू लावून नंतर ती वापरात घेण्याची जवळ-जवळ सर्वच भाविकांची पद्धत आहे. मात्र काही वेळेस श्रीबाबा ती पोथी अगर वस्तू तिच्या मालकाला परत न करता 'शाम्याच्या' स्वाधीन करीत व 'दप्तरात ठेव' म्हणून बजावीत.

अक्कलकोटचे महाराज आपले जवळील सेवेकऱ्यास व इतर भक्तजनांस त्यांच्या स्वतःच्या नावाने हाक न मारता निराळीच नावे ठेवून बोलावीत, उदाहरणार्थ, चोळाप्पा ह्यास जैन, कृष्णाप्पास निळकंठ्या, भुजंगा ह्यास फिरंगी, गणपतरावास भट, राजास कुंभार वगैरे. श्रीसाईबाबा महाजनींस 'बडे काका', निमोणकरांस 'म्हातारे काका'

गोविंदराव दाभोळकरांना 'हेमाडपंत', म्हाळसापतीस 'सोनारड्या', काकासाहेब दीक्षितांस 'लंगड्या काका', माधवराव देशपांड्यास 'श्यामा' अशा नावांनी हाका मारीत.

"कोणीही असो प्रौढबाई। तिजला हांक मारीत 'आई'।
पुरुषांस 'काका', 'बापू', 'भाई'। गोड नवलाई हांकेची ॥

(श्री सा. स. अ. १९)

श्रीस्वामीसमर्थ हे शके १८०० चैत्र वद्य १३ मंगळवार तिसरे प्रहरी चार वाजता स्वतः मांडी घालून बसले व पाहता पाहता एकदम निजानंदी निमग्न झाले. त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या एकाएकी हालावयाच्या राहिल्या. महाराजांची तेजःपुंज कांति निर्णय समयी जशीच्या तशी होती. निर्णयाची बातमी पसरताच जिकडे तिकडे हलकल्लोळ माजला. सर्व भक्तगण आक्रोश करुन समर्थांचे गुण आठवू लागले. भजनीवाल्यांचे मेळे जमा होऊन सर्वत्र भजने सुरु झाली. स्वामीभक्त चोळाप्पा ह्याने श्रीसमर्थांकरिता समाधि पूर्वीच बांधून ठेविली होती. श्रीसाईबाबांनी शके १८४० विजयादशमी मंगळवार रोजी तिसरे प्रहरी देह ठेविला.

'नाहीं पडून वा निजून। स्वस्थपणें गादीसी बैसून।
ऐसा स्वहस्तें धर्म करुन। केलें विसर्जन देहाचे ॥'

(श्री सा. स. अ. ४२)

जवळ जवळ चोवीस तासांचे वर राहूनही त्यांचा देह कडक, ताठ झालेला नव्हता. हातपाय इकडून तिकडे मोकळेपणाने हालत होते. अंगावरील कफनी फाडून काढावी लागली नाही. नागपूरच्या श्रीमंत बुट्टीसाहेबांनी बांधलेल्या दगडी वाड्यात ज्या जागेवर मुरलीधराचे मंदीर होणार होते, त्याच जागेवर श्रीबाबांच्या आज्ञेने त्यांची पुण्यसमाधि बांधण्यात आली. निर्णयानंतर पंढरपुरला ह. भ. प. दासगणूंचे स्वप्नात, शिरडीला लक्ष्मण मामांच्या स्वप्नात, मुंबईस काका महाजनी ह्यांचे स्वप्नात जाऊन श्री बाबांनी त्यांचेकडून योग्य ते विधी पार पाडून घेतले.

श्रीस्वामीसमर्थांच्या प्रयाणाला ९८ वर्षे झाली तरी ते आपल्या भक्तांस अनेक प्रकारांनी दृष्टान्त देऊन त्यांच्या मनःकामना तृप्त करतात, त्यांचे संकटातून रक्षण करतात, इतकेच नव्हे तर ते जणू प्रत्यक्षच आपल्या भक्तगणांत एकसारखे वावरत आहेत, असा अनेक अनन्य भक्तांचा अनुभव आहे. महाराजांचे प्रयाणानंतर श्रीबाळाप्पा महाराज (सुरत) वगैरे श्रीस्वामींच्या भक्तांनी भक्तिभावाचा प्रवाह फारच वाढविला आहे. श्रीसाईबाबांनी १९१८ साली विजयादशमीला देह ठेविला असला तरी, त्यांच्याच शब्दात,

"झालों जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण ।
माझी हाडें तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥ १०५
डोळ्यांआड होईन ही चिंता । करुं नका तुम्हीं मजकरितां ।
माझी हाडें ऐकाल बोलतां । हितगुज तुम्हांसवे ॥ १०७"

श्रीसाईसच्चरिताच्या २५ व्या अध्यायातील श्रीबाबांच्या तोंडचे वरील बोल वाचले की, श्री नृसिंह सरस्वतींनी आपण गुप्त झालो तरी आपला वास गुप्तरूपाने गाणगापुरात आहे असे सांगितले होते, त्याची स्मृति होते. अगदी तेच बोल श्री बाबांनी निराळ्या शब्दात सांगितले आहेत. श्रीबाबांची समाधि म्हणजे नुसते जागृत देवस्थान नसून ते स्वतः अनेकांच्या स्वप्नात जाऊन किंवा अन्यप्रकारे दृष्टांत देऊन लोकांच्या मनात विश्वास निर्माण करतात व त्यांना शिरडीला येण्याला प्रवृत्त करतात. श्रीसाईबाबांच्या किर्तीचा प्रसार करून लोकांना त्यांच्या आशीर्वादाचा लाभ करून देण्याची मोठी कामगिरी श्री. नानासाहेब चांदोरकर ह्यांनी पार पाडली. ते प्रथम मामलेदार व नंतर डेप्युटी कलेक्टर असल्यामुळे त्यांना पुष्कळ फिरावे लागे व अशा दौऱ्यांचे वेळी ते श्रीबाबांचे गुणवर्णन करून लोकाच्या मनात त्यांच्या दर्शनाविषयी लालसा उत्पन्न करीत. मुंबई व ठाणे जिल्ह्यातील त्यांचे याबाबतीतील कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या व्यतिरिक्त ह. भ. प. दासगणू महाराज यांनी कीर्तनद्वारा व संतचरित्रात्मक लेखनद्वारा तसेच काकासाहेब दीक्षित यांनीही श्रीबाबांच्या नावाचा चोहोकडे प्रचार करून भक्तिमार्गाची ध्वजा फडकावीत ठेवण्याचे महान कार्य केले आहे.

समाजाचा एक घटक या नात्याने प्रत्येक व्यक्तिच्या बोलण्याचालण्याचा, हालचालीचा समाजावर बरावाईट परिणाम होत असतो, आणि समाजाचेही त्याच्यावर नकळत परिणाम घडत असतात. व्यक्ति व समाज यांचा हा निकटचा संबंध लक्षात घेऊन संतपुरुष समाजाला योग्य ते मार्गदर्शन करीत असतात. श्री अक्कलकोटचे महाराज व श्रीसाईबाबा यांनी सुरू केलेले कार्य तसेच पुढे चालू राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तिने आपला वाटा उचलावा ह्यापेक्षा भक्तिचा जास्त श्रेयस्कर मार्ग दुसरा कोणता ?

**आधार :—** १) 'श्री अक्कलकोट निवासी स्वामी महाराज यांचे चरित्र'
—ले. कै. गणेश बल्लाळ मुळेकर
२) 'श्रीसाईसच्चरित' —ले. कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर
उर्फ 'हेमाडपंत'

.............

# श्रीगुरुगौरव....

● श्री. **चकोर आजगांवकर**, एम्. ए.
वाय ११/१६९ गव्हर्नमेंट क्वार्टर्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

## श्रीदत्त व साईबाबा

● मी श्रीसाईबाबा आणि श्रीगुरुदत्तात्रेय यांच्यामध्ये तिळमात्र अंतराय मानीत नाही, श्रीसाईबाबा हे श्रीदत्तांचे गुरुतत्त्वच सिद्धरुपाने अवतीर्ण झाले होते. श्रीबाबांची थोरवी ही त्यांच्या सच्चिदानंद श्रीसद्‌गुरु पदवीत सामावली आहे, त्यांच्या जयजयकाराची ललकारी "श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु श्रीसाईबाबा" अशी गर्जत रहाते व आसमंत पवित्र करते. श्री. चांदोरकरानी एकदा कोपरगावच्या दत्ताचे दर्शन चुकवून शिरडी गाठली, त्यावेळी श्रीबाबांनी त्यांची कानउघाडणी करून त्यांना "दत्तासारखे दैवत नाही. श्रीगुरुदत्तांना चुकवून तू मजकडे आलास तर मी तुला पावेन काय ?" असा भेदक प्रश्न विचारला होता. मशिदीतल्या ज्या फकिराकडे ते साऱ्या घटनांचे वा कृपेचे कर्तृत्व देत तो फकीर दुसरा तिसरा कुणीहि नसून तो अवधूत दिगंबर श्रीगुरुदत्तात्रेय होता. तो फकीर व ते स्वतः हे एकरूप होते. "अनल हक" (मी श्रीगुरुरूप परमेश्वर आहे) असे म्हणण्याऐवजी श्रीबाबा "यादे हक" (मी श्रीगुरुंचा यादगार बंदा आहे), असे केवळ विनयाने सांगत म्हणूनच श्रीगुरुपौर्णिमा किंवा दत्तजयंती हा श्रीबाबांच्या उपासनेचा वा महात्मतेचा पर्वकाल मी मानतो.

## संतानी गाअिलेले गुरुमहात्म्य

"गुरु तेथे ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन" असे म्हणणारे ज्ञानेश्वर हे पैलमेरूच्या शिखरी खेचरीमुद्रा लावून बसलेल्या शिवयोगी श्रीगुरुंचे ब्रम्हपद वर्णितात. नामदेव म्हणतात "सद्‌गुरुनायके कृपा पूर्ण केली । निज वस्तु दाखविली माझी मज" श्रीगुरुनीच त्यांना त्यांचे सुख दाखवून प्रेमकळा भक्ति व ज्ञानमुद्रा यांची ओळख करून दिल्याचे ते सांगतात. तुकारामानीहि "तीन शिरे व सहा हात" अशा श्रीगुरुंना साष्टांग दडंवत घालून श्रीगुरुंचे ऋण प्रगट केले आहे. एकनाथ महाराज म्हणतात "वेदा पडिले मौन । शास्त्रे वेडावली । वाचा हे निमाली । ते श्रीगुरु ।" संतकवि दासोपंत व मुक्तेश्वर यांनीहि रोकडा ब्रम्हसाक्षात्कार करणारे ते

श्रीगुरु किंवा ज्याच्या नांवे असंख्य भवसागर तरुण गेले ते श्रीगुरु हेच होत असे अगदी निःसंदिग्ध स्पष्ट शब्दात सांगितले आहे. महाराष्ट्रातील संताची साक्ष घेतली तर श्रीगुरुंचे महात्म्य त्यांनी असे मुक्तकंठाने गायिलेले आढळून येईल.

## समन्वयात्मक श्रीगुरुदेवता

थोडक्यात सांगायचे म्हणजे श्रीगुरु हे योग्यांचे योगेश्वर, भक्तांचे परमेश्वर, ज्ञानीजनांचे ज्ञानेश्वर आहेत. हठयोग, मंत्रयोग, लययोग, कुंडलिनीयोग इतकेच नव्हे तर ज्ञान भक्ति व कर्मयोग यांचा श्रीगुरु हे प्रीतिसंगम आहेत. त्रिभुवन संचारी, स्मर्तृगामी, भक्तवत्सल, करुणासागर आणि सर्वांतर्यामी अशी श्रीगुरुंची बिरुदावली आहे. सर्वस्पर्शी, सर्वदर्शी, सर्व शक्तिमान श्रीगुरुराज म्हणजे भारतीय धर्म, संस्कृती, देवता, आध्यात्म कल्पनांचा एकरुप, समन्वयी पण लोकविलक्षण अलौकिक आविष्कार होय.

## गुरूंचे स्वरूप

श्रीदत्तात्रेय हे श्रीगुरुतत्त्वाचे प्रतीकात्मक रूप! श्रीदत्त हे गुरुंचे गुरु, तसे मानवांचे गुरु आहेत. मायेचा अंधकार दूर सारून ज्योर्तिमयतेकडे नेणारे, सगुणसाकाराकडून निर्गुणनिराकाराकडे स्थित्यंतर करणारे स्थलाकडून सूक्ष्माच्या प्रांतात लोटणारे, श्रीदत्त हे परात्पर गुरु आहेत. श्रीगुरु हे ब्रम्हाविष्णू महेशात्मक असून ते शाश्वताचा दीपस्तंभ, संसारसागरातील नौका, भक्तांचा कल्पद्रुम आहेत. ते माउलीहून मायाळ, कौमुदीहून शीतळ आहेत. श्रीगुरु हे सर्व मांगल्याचे मूर्तस्वरूप. मोक्षाचे कल्पतरु, ज्ञानाचे महासागर प्रेमकरुणेचे महासिंधु, भक्त कामधेनू आहेत- सारे नवनिधी, अष्टमहासिद्धी सारी ऐश्वर्ये त्यांच्या पायाशी लोळत असतात. ते अभेद, निर्मळ, निरवळ परब्रम्ह आहेत. ते करुणाघन, अशरण-शरण आहेत. विश्वाची निर्मिति, पालन, संहार या तीनहि स्थितीवर त्यांचा समान अधिकार आहे. ते त्रिगुणाच्या, त्रिकाळाच्या पलीकडले आहेत. स्वतःच्या आदिमायारूप त्रिपुरसुंदरी संकल्प त्यांनी ब्रम्हांडाचा विराट पसारा निर्माण केला. या अवधूत दिगंबर गुरुच्या सामर्थ्याचा कुणाला पारावार लागत नाही. अजर, अमर, नित्य, सनातन निर्विकल्प, निरंजन असे त्यांचे आत्मस्वरूप त्यांची माया ओलांडून पैलपार गेलेल्या त्यांच्या कृपांकितालाच समजू शकते.

## गुरुभक्तिचा प्रसार

श्रीदत्तगुरु हे महाराष्ट्रातील सह्याद्रीनिवासी परमदैवत असले तरी श्रीदत्तगुरु तत्त्व हे त्रिभुवनात संचार करणारे, स्मरण करताच 'दत्त' म्हणून प्रगटणारे आहे

श्रीगुरुनी श्रीदत्तात्रेयाच्या त्रिमूर्तरुपात पदार्पण केल्यावर श्रीगुरुपरंपरेच्या सामावक तत्त्वज्ञानाने विश्व मोहरले, एकात्मतेच्या मंत्राने परिमळले. श्रीगुरुभक्तीची ही भूमि कृष्णापंचगंगेच्या भीमा अमरजेच्या संगम ने शीतल झाली आहे. हिच्या सीमा गिरनार पासून नर्मदेपर्यंत पीठापूरापासून कन्याकुमारीच्या सेतूपर्यंत पसरल्या आहेत. श्रीदत्तपरंपरा म्हणजे सह्याद्रीची सोशिकता, गिरनारची उत्तुंगता, कृष्णेची शीतलता, भीमेची तीर्थरुपता ! श्रीगुरुमार्गात सारे योग सामावले आहेत. श्रीगुरु हे जसे राजयोगी माणिकप्रभू आहेत, संन्याशी नृसिंह सरस्वती आहेत, अवधूत श्रीपादवल्लभ व स्वामी समर्थ आहेत, ब्राह्मशारद तपस्वी वासुदेवानंद सरस्वती आहेत तसेच अवधूत मलंगरुप सिद्ध श्रीसाईबाबाही आहेत. श्रीगुरु ही भारताच्या आध्यात्मिक देहात संचरणारी कुंडलिनी शक्ति आहे. या गुरुमार्गाला गाणगापूरच्या निर्गुण पादुकांचे रसरसते चैतन्य, नृसिंहवाडीच्या मनोहर पादुकांचे प्रत्ययकारी पावित्र्य, औदुंबरची नितांत शांती, माणिकनगरची राजसत्ता, अक्कलकोटची लोकविलक्षण अलौकिकता, माणगावची सात्त्विक मंत्रमयता व शिरडीची सिद्धकृपामय प्रेमकरुणामयता यांचा स्पर्श आहे. नाथ, वारकरी, तांत्रिक, शाक्त महानुभाव रामदासी या साऱ्या उपासनी पंथानी श्रीगुरुंच्या दत्तरूपाचे मुक्तकंठ गुण गायन केले आहे.

## श्री गुरूंची मूर्ती व कीर्ति

श्रीगुरुंची भस्मचर्चित पण पितांबरधारी, जटाजुटांचा मुकुटधारण करणारी मूर्ती विवेक वैराग्याच्या खडावा धारण करते व त्रिभुवनात संचरते. शंखचक्र त्रिशूल, माला कमंडलू धारण करणारी गुरुमूर्ती शरीरावर आनंदाचे रोमांच व हृदयात प्रेमाचे कल्लोळ उठवते. चारी वेद गुरुच्या मागे मागे श्वानासारखे अनुसरतात. साऱ्या मंत्रदेवता गोमातेच्या रुपाने त्यांच्यापाशी छायेसारख्या उभ्या रहातात. हेच श्रीगुरु आपल्या प्रेमकरुणामय कृपारुपाने वावरताना श्रीसाईबाबांचे मलंग रुप धारण करतात. ते वैदिक असतात तसे मलंगहि असतात. ते जटाधारी असतात तसे जीर्ण फडक्याचे वस्त्रहि बांधणारे असतात. ते पितांबर धारी तसे कफनीधारीहि असतात. ते कमंडलू प्रमाणेच टमरेलहि हाती धरतात श्रीगुरुचे प्रतीक परस्पराविरुद्ध टोकाची स्वरुपे धारण करू शकते. अनसूये पोटी जन्म घेऊन मातृत्व व पातिव्रत्य यांचा मान राखणारे, पित्याच्या तपश्चर्येचा आदर करणारे गुरु श्रीसाईरुपाने येतात तेव्हा नाव गाव, मातापितर, गणगोत यांचा मागमूसही शिल्लक ठेवीत नाहीत. काशीस्नान, गाणगापूरात ध्यान, कोल्हापुरात भिक्षा, सागरावर सायंसंध्या व माहुरात शयन करणारे गुरु भारताची भौगोलिकता एकत्र सांधतात तसेच श्रीसाईरुपाने येताना ते

हिंदु, मुस्लिम, पारशी इत्यादी धर्म पंथ व जातिभेद यांना छेद देऊन मानवतेच्या महाद्वारातून प्रवेश करतात व जीवनाला करुणेचा स्पर्श अगदी सरळ सरळ करतात.

## सद्‌गुरुबाबांचे विरोधाभासात्मक जीवन

श्रीबाबांच्या रुपाने प्रगटताना श्रीगुरुनी आपले जीवन अनेक विरोधाभासानी रंगविलेले आहे. मशिदीत राहूनहि त्यांनी तेथे मंदिरातील घंटा व अग्नीवेदी उभारली होती. एका जागी बसून ते साऱ्या विश्वाला स्पर्श करीत. रुद्रावतार धारण करुनहि संयमाचे धडे देत. दक्षिणा मागत पण एक कवडीहि जवळ ठेवीत नसत. त्यांचे बरोबर कावळे, कुत्रे, गोर गरीब एका ताटात भोजन करीत. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत. प्रवचने झोडली नाहीत, पण त्यांच्या मौनात वेदांत उचंबळे. त्यांचा एकेक शब्द तत्त्वज्ञानाचे सार सांगून जाई त्यांचे उश्वासहि उपनिषदे बनत! श्रीबाबांचे गुरुतत्व असे अलौकिक व लोकविलक्षण असे. ते आपल्या गुरुना 'अवधूत' 'फकीर' अशा प्रतिकात्मक नावाने हाकारीत स्वः पूर्णब्रम्ह शुकमुनि, आदिनाथ शिवदत्त, रामभक्त कबीरदास अशा रुपात वावरुनहि ते स्वतःकडे गुरुत्व घेत नसत. त्या 'अल्ला मालिक' फकीर अवधूताला ते 'सरकार' म्हणत त्या फकीर श्रीगुरुचे साम्राज्य चराचरावर होते. त्याचे मुक्तिधन गाड्यागाड्यानी भरलेले होते. श्रीबाबा त्या धनाचे जणु विश्वास होते, दातार होते. तो फकीर म्हणजे सर्वेश्वर, औदुंबर, श्रीगुरु दत्तात्रेयच होते आणि त्या गुरुचे सर्वात सामर्थ्यशाली प्रगटीकरण व अवतरण श्रीसाईबाबा मधूनच झाले होते!

## श्री बाबांच्या कृपेचे स्वरूप

श्री आदिनाथ शिवरुप दत्तानी सांगितलेल्या गुरुगीतेत तीर्थयात्रा, दाने, तपे, व्रते, मंत्र तंत्र, जप जाप्ये श्रीगुरुकृपेविना निष्फळ असल्याचे सांगितले आहे. श्रीगुरुकृपेचा अमृतमय स्पर्श झाल्यावाचून प्राणायाम, हठयोग शरीरकष्ट सारे वाया जातात. श्रीगुरुसुयोग्य शिष्यामध्ये शक्तिपात घडवून त्याच्या प्राणमनाचा लय करवितात व त्याची अंतर्हित आत्मज्योति प्रगट करतात. कृपा झाल्यावर इतर साधना व्यर्थ ठरतात परंतु कृपेला पात्र होण्यासाठीची पार्श्वभूमी म्हणून तसेच शरीर, मन व आचारशुद्धीसाठी या साधना करायच्या असतात. श्रीगुरुस्वरुप सच्चिदानंद अवधूत श्रीबाबाहि म्हणतात "तुम्ही श्रद्धा व शरणांगती या दोन तत्त्वाची गुरुदक्षिणा मला द्या मी तुमच्या अस्तित्वात आरपार प्रवेश करुन तुम्हाला सच्चिदानंदात विलीन करीन. तुम्ही मजकडे समर्पण भावनेने पहा. मी कृपेच्या वेधदृष्टीने

तुमच्याकडे पाहीन. हाच माझा गुरुपदेश आहे. तुम्ही कोणताहि मंत्र, तंत्र, जप, ध्यान योग याग आचरु नका. साऱ्या साधनांच्या वा योगांच्या पूर्तीसाठी अखेर तुम्हाला माझ्या गुरुस्वरुपाकडेच धाव घ्यावी लागेल. तुम्ही तुमचा भार मजवर सोपवा. मी तुमच्या हाताला धरुन तुम्हाला भवसागराच्या पैलपार नेईन."

## प्रेम कृपेचा पंथराज

श्रद्धा व सहना (सबूरी) यातून श्रवणाऱ्या कृपेद्वारे श्रीगुरु कैवल्यदान करतात. साऱ्या साधना हे सायास ठरतात. भक्ति भावावस्था निर्मिते, ज्ञान सहजावस्था दाखविते. कर्म नैष्कर्म्य शिकवते. योग सूक्ष्मदेहातून कारण बीजापर्यंत नेतो. परंतु महाकारणावस्था तुरीयावस्था किंवा उन्मती अवस्था समजण्यासाठी श्रीसद्गुरु साईबाबांच्या कृपागाडीत बसावे लागते ही कृपानौका, कृपावाहन आपल्या स्वयं-चलित गतीने आनंदाच्या प्रांतात नेऊन सोडते. याला कुणी 'दिव्य प्रेम' म्हणतात, तर कुणी 'नित्यावधान' म्हणतात परंतु शुद्ध आचार परमेश्वरानुसंधानपर वैखरी, तद्रूप मन बुद्धी, अहंकारातील (जाणीवीतील) दिव्य अस्मिता भाव व समता दृष्टी आणि श्रीबाबांसारख्या विश्वात्मक चैतन्यगुरुच्या पादुकावर आत्मसमर्पण हीच खरी साधना होय. असे जीवन मोक्षाकार होते हाच श्रीगुरुंचा गुरुगौरव, हीच श्री दत्तांची गुरुपौर्णिमा, हीच श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबांची गुरुदक्षिणा होय !

प्राणमनाचा मी अद्भुत लय
अनाहताचा ध्वनि नादमय
मी तेजोमय ज्योती चिन्मय
धरुन शक्तिकर हाती माझा कर शून्यात प्रवेश ॥
मूर्तिमंत मी मोक्ष समोरी मीच मंत्र आदेश ॥
अंतरी ठसो हाच उपदेश ॥ ध्रु. ॥　　　(श्री साईगीतायन)


'मुलांचे साईबाबा'
या मराठी गोष्टीरूप पुस्तकाचा हिंदी अनुवाद
'बच्चोंके साईबाबा'
मूळ मराठी लेखक : कै. प्रा. द. दि. परचुरे
हिंदी अनुवाद : सदानंद चेंदवणकर का. संपादक श्रीसाईलीला

# सद्‌गुरूप्राप्ती

● श्री. वि. अ. कुलकर्णी
११६२।३६, ई, शिवसदन, कोल्हापूर.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरूर्देवो महेश्वराः ।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

● भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला प्राधान्य आहे. साधनेमध्ये गुरु-शरणांगती प्रथमतः असते. सद्‌गुरुशिवाय साधनेचा यथार्थ समजून येत नाही. केवळ शास्त्र आणि तर्काने लक्ष्यापर्यंत कोणताही साधक पोहचू शकत नाही. अनुभवी गुरु शिष्याला योग्य मार्ग दाखवून मार्गातील अडी अडचणी, अडथळे निदर्शनास आणून त्याला लक्ष्यापर्यंत पोहचवितो. म्हणूनच श्रुतिपासून आजपर्यन्त साऱ्या संतांच्या मुखातून गुरुविषयीचा आदर, गुरुभक्तिचा महिमा आपल्याला आढळून येतो. इतकेच काय परंतु भक्ताच्या पुढे जर गुरु आणि गोविंद दोघे उभे राहिले तर प्रथम गुरुलाच वंदन करण्यास संतानी सांगितले आहे कारण गुरुकृपेशिवाय गोविंद दर्शन लाभत नाही. म्हणूनच ते पुरुष धन्य होते ज्यांना सद्‌गुरु लाभले आणि ज्यांनी आपले सारे जीवन सद्‌गुरुच्या संतसंगतीत आणि त्यांच्या आज्ञापालनेत व्यतित केले.

खरं पाहता परमार्थातील साधना सद्‌गुरुच्या सत्‌संगतीतच संभवनीय आहे. कृपावंत गुरु पाठीराखा असल्याशिवाय, विषयवासनेने, आणि भोगवादाने उसळलेल्या या संसाररूपी सागराचा पैलतीर गाठणे कधीही शक्य नाही. म्हणूनच प्रत्येक साधकाला सद्‌गुरुचा शोध करणे अत्यंत आवश्यक आहे आणि ईश्वराची सार्थ सद्‌गुरु मिळणेविषयी आर्त भावनेने आळवणी करणे अत्यंत जरुर आहे. कारण परमेश्वरकृपेनेच संत महात्म्यांची प्राप्ति होते. अर्थात कधी कधी सद्‌गुरुच्या रुपात परमेश्वर स्वतः प्रकट होऊन भक्ताला मार्गदर्शन करतो यात शंका नाही. सद्‌गुरुचा शोध प्रत्येकाने मनापासून केला पाहिजे. एक कुतुहल म्हणून, अथवा सद्‌गुरुची परिक्षा म्हणून जर सद्‌गुरुची अपेक्षा केली तर कधीही परमेश्वर कृपावंत होत नाही. कारण सद्‌गुरु देखील कोणत्याही परिक्षेला उत्तीर्ण होण्यासाठी किंवा जगात मानप्रतिष्ठा मिळविण्यासाठी कोणाचेहि शिष्यत्व स्वीकारीत नाहीत. जे शिष्य श्रद्धापूर्वक

त्यांना शरण जातात, त्यांनाच ते आपल्या अधिकाराने आपले गोपनिय, ज्ञान प्रदान करतात. अश्रद्धाळु, तर्किक, दोषान्वेषवकारी, नास्तिक आणि कुतुहलप्रिय अशा शिष्यांपुढे आपले ज्ञान प्रकट करणे ते आपले कर्तव्य मानीत नाहीत.

या बाबतीत स्वतः श्री भगवान म्हणतात :—

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥
(गीता । १८।६७)

अर्थ–"हा जो मंत्र मी (गुप्त रहस्य) मी तुला सांगत आहे, तो कधीही तपोहिन, भक्तिरहित, माझी निंदा करणाऱ्या माणसाला सांगू नकोस." यावरून असे सिद्ध होते की संत–महात्मा असे सद्गुरु आपल्या शिष्याची परिक्षा पाहिल्याशिवाय कधीही ज्ञान प्रदान करीत नाहीत. ते स्वतःला कधीही अधिकार पुरुष किंवा मोठा पुरुष मानीत नाहीत. स्वतः अतिशय ज्ञानी आहोत असे ते भासवित असतात.

तीव्र इच्छाशक्ति, आणि श्रद्धापूर्वक सद्गुरुची सेवा केली तर सद्गुरुचे मार्गदर्शन लाभते यात शंकाच नाही. संन्यासी आणि गृहस्थामध्ये आजही अनेक सद्गुरु आपल्याला आढळतील. अनेक ऋषी सद्गुरु आजही अस्तीत्वात आहेत. परंतु ते सहसा प्रकटपणे दिसत नाहीत आलि प्रकटपणे राहणारे सद्गुरु ओळखणे अतिशय कठिण आहे. कारण यांचा पोषाख काही वेगळा नसतो की ज्यामुळे त्यांना आपण सर्व सामान्यापासून वेगळे काढू शकू.

असे असूनदेखील आजकाल सद्गुरु शोधताना सावधानी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. वर्तमानकाळात जगद्गुरु, विष्णोपदेशक सद्गुरु, ज्ञानी, योगिराज आणि भक्त लोकांचा बाजार भरला आहे. ही सारी दुर्लभ स्थाने आज फारच स्वस्त झाली आहेत. असे काही ढोंगी सद्गुरु असतात की ज्यांची खुलमखुल्ला पूजा होते. इतके परमेश्वराचे अवतार एकदम कसे निर्माण झाले कळत नाही. आश्चर्य म्हणजे यातील एकही अवतार दुसऱ्या अवताराला मानत नाही. अशा परिस्थितीत अवतार ही काय चीज आहे ते कळून घेतले आजच्या युगात प्रत्येक पुरुषाचे परम कर्तव्य आहे

आजकाल गुरु तर गावोगावी, गल्लोगल्ली मिळतात. सारे काही गुरुला अर्पण केले तर ईश्वराला पोहचले असे सांगणारे हजारो नाही तर लाखो गुरु आहेत. परंतु दुःख याच गोष्टीचे आहे की या गुरुंच्या कृपाप्रसादाने उद्धार एखाद्याचा होतो. सद्गुरु तर तोच असतो जो शिष्याला सत्मार्गावर आणतो. त्याच्या हृदयात परमेश्वराविषयी आदराची भक्तिची भावना निर्माण करतो. जो स्वतःची नाही तर

सर्वव्यापी, सर्वसाक्षी परमेश्वराची पूजापाठ शिष्यास शिकवतो, जो स्वतःच्या कोणत्याहि प्रकारे कुमार्गावर जाऊ देत नाही, जो आपल्या शिष्याला मार्गातील अडचणीविषयी मार्गदर्शन करतो, जो त्याग आणि सदाचार शिकवितो, जो निर्भय होऊन भगवंताची भक्ति शिकवितो, जो स्वतः पवित्र राहून काम, क्रोध, लोभापासून दूर राहून त्याचे अनुकरण आपल्या शिष्याला करावयास शिकवतो. तोच खरा सद्-गुरु होय. हाच सद्गुरु शिष्याला परमात्म्यापर्यन्त पोहचू शकतो. भगवंत म्हणतात.

निर्माणमोहा जितसंगदोषा
अध्यात्मनित्या विनिकृतकामाः
द्वदैविमुक्तः सुखदुःखसंज्ञै
र्गच्छान्त्यमूळः पद्माध्ययं तत् ।।

(गीत १५-५)

ज्यांची हृदयात मान-मोहाची अपेक्षा नाही, जो आसक्तीवर विजय मिळवू शकतो, जो नित्य परमात्म्याच्याच चिंतनामध्ये तल्लीन असतो, जो भौतिक इच्छा मनात ठेवीत नाही, जो सुखदुःखासारख्या क्षुद्र भावनांना मनात थारा देत नाही असे बुद्धिमान पुरुषच परमेश्वरापर्यन्त पोहचू शकतात.

तद् बुद्ध यस्तदात्मनस्तन्निष्ठास्तपरायणा
गच्छन्त्यपुनरावृत्ति ज्ञानानिर्धूतकल्पशाः ।।

ज्यांची बुद्धि परमात्मरूप झाली आहे, ज्यांचे मन परमात्मरूप झाले आहे, ज्यांची निष्ठा केवळ परमात्म्यातच भरलेली आहे, ज्यांचे मन परमात्मपरायणच आहे, अशांच्याच ज्ञानाने पापी पुरुषसुद्धा परमात्म्याला प्राप्त करू शकतो.

कोणालाही एकदम गुरु करू नये, कारण गुरुला आपण एकप्रकारे आपले सारे जीवनच अर्पण करीत असतो. म्हणूनच खूप समजून-उमजून गुरु शोधायला हवा. नाममात्र गुरुमुळे कोणताच लाभ होत नाही, उलट प्रत्यक्ष हानि मात्र होते.

या गोष्टीने नाराज होता कामा नये की आजच्या जगात सदगुरु अस्तित्वात नाहीत, आज आपल्या हृदयात तीव्रता ज्ञानपिपासा आढळत नाही. कदाचित यांच्यामुळे खरे सद्गुरु लाभत नसतील, जर आपल्या हृदयामध्ये ज्ञानाची ओढ निर्माण झाली तर नक्कीच सद्गुरु परमेश्वर निर्माण करील.

..............

# भगवान श्रीदत्तात्रेय

• सुभाषचंद्र



गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

दत्त ही देवता म्हणजे ब्रम्हा, विष्णू व महेश या तिघांच्या एकरूपतेचे प्रतिनिधिक स्वरूप असून सत्व, रज व तम या त्रैगुण्यांचे एकत्रीकरणही तिच्यात झालेले आहे असा गाढ समज आहे. वेदात या देवतेचा उल्लेख नसला तरी विष्णू व रुद्र या दोन समाविष्ट देवतांचा मात्र त्यात आहे. यावरून दत्त या देवतेचा उगम परंपरा वेदात खास आहे असे म्हटल्यास हरकत नाही. म्हणजेच दत्त या देवतेचा उगम, परंपरा वेद व तदनंतरच्या कालापर्यन्त गेलेला दिसून येतो. महाभारताच्या अनुशासनपर्वात, वनपर्वात व शांतिपर्वात श्री दत्तात्रेयाचा उल्लेख सापडतो.

भागवत पुराणात तीन निरनिराळ्या ठिकाणी अवतारांची संख्या दिली असून ते कोणते ते पण सांगितलेले आहे. त्यात दत्तात्रेयाचा उल्लेख असून अलर्क, प्रल्हाद, यदु व सहस्त्रार्जुन हे त्याचे शिष्य होत व त्याने 'आन्विषकी विद्या' अलर्काला सांगितली असे स्पष्ट लिहिलेले आढळते. मार्कन्डेय पुराणात दत्तात्रेयाने अलर्कास केलेला सुंदर उपदेश आहे. दत्तावताराबद्दल वेगवेगळया पुराणातून वेगवेगळया कथा सापडत असल्या तरी शिवपुराण, शतरुद्रसंहिता यामध्ये त्याबद्दल एकच कथा दिली आहे. ती थोडक्यात अशी— अत्रि नामक ऋषींनी पुत्र प्राप्तीसाठी त्र्यक्षकुल पर्वतावर घोर तपश्चर्या केली त्यामुळे त्यांच्या मस्तकातून ज्वालांचे लोटच्या लोट निघून त्रैलोक्याचा दाह होऊ लागला सर्व देव त्यावेळी भयभीत झाले व त्यांचे जवळ आले आणि त्यांनी अत्रिमुनींना ब्रम्हा, विष्णू व महेश यांचे अंशरूप पुत्र होतील असा वर दिला व मगच अत्रि ऋषींचा तपोग्नि शांत झाला. पुढे अत्रिंना सोम, दत्त व दुर्वास असे पुत्र झाले व त्यामध्ये ब्रम्हा, विष्णू व महेश हे अंगरूप होते.

मार्कंडेय पुराणात असे म्हटलेले आहे की अनसूयेच्या गर्भातून ब्रम्हा, विष्णु व शिव यांचे अंशरूप पुत्र उत्पन्न झाले खरे पण पुढे ब्रम्हाच्या अंशापासून चंद्रमा उत्पन्न झाला व साऱ्या प्राणी मात्रांचा तो जीवन आधार बनला. विष्णूच्या अंशापासून दत्तात्रेय निर्माण झाले व भगवान शंकराच्या अंशापासून दुर्वास उत्पन्न झाला. अत्रिऋषींची पत्नी अनसूया हिच्या पातिव्रत्याची कसोटी पहावी म्हणून देव श्रेष्ठ ब्रम्हा, विष्णू व महेश हे अत्रींच्या आश्रमात येऊन त्यांनी त्या साध्वीला विवस्त्र होऊन इच्छाभोजन दे अशी चमत्कारिक मागणी केली. दुःखी कष्टी झाली परंतु गृहस्थाश्रम धर्म परायण गृहिणी या नात्याने तिने देवांची ही मागणी पूर्ण करण्याचे ठरवून ती देवाना इच्छा भोजन देण्यासाठी म्हणून विवस्त्र बाहेर आली परंतु बाहेर येऊन पहाते तो त्या देवांची तीन सुंदर बालके तिला तिथे दिसली.

अनसूया देवांच्या कसोटीस उतरल्यामुळे ते तिन्ही देव खऱ्या स्वरुपात प्रकट होऊन त्यानी ती तिन्ही बाळे तिला अर्पण केली त्यांचीच नावे अनुक्रमे सोम, दत्त व दुर्वास अशी ठेवण्यात आली. पुढे दुर्वास तपश्चर्येसाठी अरण्यात गेला, सोमाने चंद्र मंडळ गाठले व दत्त आपल्या आईवडीलांची सेवा करण्यासाठी आश्रमातच राहिला. हाच अत्रिपुत्र अत एव आत्रेय व आत्रींना तो देवांनी दिला म्हणून 'दत्त' यास्तव आत्रेय दत्त किंवा दत्तात्रेय असे त्यास नाव पडले. अशी दत्त जन्माची कथा आहे.

महाभारतांतर्गत अनुशासन पर्वात स्वयंभू मन्वंतरातील अत्रिऋषींच्या तीन पुत्रांपैकी दत्त हा एक असल्याचे सांगितले आहे.

स्वरोचित मन्वंतरातील सप्तर्षींपैकी दत्त हा एक ऋषी असून त्याला निमि नावाचा एक पुत्र होता. या निमीवरुनच निमिष ही संज्ञा काल विभागाला मिळाली. हा निमी कोणतेही सत्कृत्य मनात येताच उरकून घेत असे. कारण जीवीत यात्रा क्षणभंगूर आहे असे तो मानी.

दत्ताचा जन्म चालू मन्वंतराच्या प्रारंभी प्रथम पर्वातील त्रेतायुगात झाला. तो परम ब्रम्हनिष्ठ होता. आलर्क, प्रल्हाद, यदु व सहस्त्रार्जुन यांनी त्याचे शिष्यत्व पत्करून त्याजकडून ब्रम्हविद्या संपादन केली. नऊमास गर्भावास भोगून मार्गशीर्षाच्या पौर्णिमेस अनसूयेच्या पोटी दत्ताचा जन्म झाला असे स्कंदपुराणात दिलेले आहे.

दत्त ही देवता सदैव आपल्या शिष्यांवर दया करणारी, त्यांनी केलेल्या घोड चुकांच्याबद्दल त्यांना क्षमा करणारी आणि दुष्ट दैत्यांपासून त्यांना अभय देणारी अशी देवता आहे. काही ठिकाणी तिला विष्णूचा सहावा अवतार तर काही ठिकाणी चौथा अवतार मानलेले :आहे. तिने यज्ञ क्रियासहित वेदांना पुनर्जीवित केले. चारी वर्णांची पुन्हा स्थापना केली आणि सर्वत्र पसरलेल्या अंधःकाराचा समूळ नाश केला असा उल्लेख हरिवंश पुराणात आहे.

मार्कंडेय पुराणात दत्ताने जृम्भ नामक दैत्याच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या राक्षस सेनेचा पराभव योगबळाने केला अशी कथा आहे. यामुळेच की काय या देवतेचे अनेक भक्त बनले. नाथपंथीयातील अनेक थोर पुरुषांना दत्त ही देवता योगातील सिद्धी देणारी देवता आहे असे मानले आहे. मत्स्येंद्रनाथांचे शिष्य गोरखनाथ यांना आपल्या योग बलाचा भारी अहंकार होता इतका की ते आपली भिक्षा झोळीच आकाशमार्गे भिक्षेला पाठवीत. एकदा दत्तात्रेयांनी ती झोळी आपल्या योग सामर्थ्याने खाली पाडली. त्यामुळे दत्तात्रेयाचे आणि गोरखनाथाचे युद्ध झाले व त्यात गोरखनाथाचा सपशेल पराभव होऊन त्याचा सर्व गर्व परिहार झाला. शेवटी त्याने दत्तात्रेयाचा उपदेश ग्रहण केला अशी कथा दत्त-गोरख संवादात दिलेली आहे. अनेक नाथपंथी साधूंचे दत्तात्रेयांच्या वेषाशी बरेच साम्य होते असे आढळते.

साऱ्या चिरंजीवात दत्त व मारुती ही दोन दैवते अग्रेसर आहेत. शनीची बाधा दूर होण्यास या दोन्ही देवतांचे नामस्मरण पुरेसे आहे.

महानुभाव पंथियानी आपल्या पंच कृष्णामध्ये दत्त देवतेस स्थान दिले आहे. त्यांच्या पंच कृष्णाची नावे (१) दत्तात्रेय (२) चक्रपाणी, (३) श्रीकृष्ण, (४) गुंडम राऊळ, (५) चक्रधर अशी आहेत. महानुभाव पंथाचे संस्थापक जे चक्रधर त्यांच्या गुरुंचे गुरु जे चांगदेव राऊळ त्यांना श्रीदत्तात्रेयाने व्याघ्र वेषात दर्शन दिले होते अशी कथा आहे.

श्रीदत्तात्रेयांच्या सर्व मूर्ती मधून दिसणारी त्याची तीन तोंडे म्हणजे ब्रम्हा, विष्णू व महेश हे होते; व त्याच्यामागे असलेली गोमाता आणि चार श्वान ही अनुक्रमे पृथ्वी व चार वेद यांची सूचक आहेत असा थोर जाणत्यांचा समज आहे.

श्री दत्तात्रेयाने संन्यास पद्धतीचा प्रसार प्रचार केला. आपले वडील अत्री ऋषी यांच्या आज्ञेवरून त्याने गौतमी नदीपाशी दीर्घकाल महेश्वराची आराधना केली. तेव्हा श्रीशंकर प्रसन्न झाले व त्यांनी त्यास मुक्ती योग रहस्य समजावून सांगून आत्मज्ञान दिले तेव्हापासून गोदावरी (गौतमी) जवळील भागास आत्मतीर्थ असे नाव पडले.

सह्याद्रीत मल्लकी नावाचे एक गाव आहे. तिथे एक दत्तात्रेय आश्रम आहे. परशुरामाची माता रेणुका त्याठिकाणी सती झाली म्हणून त्याचे नाव 'मातृतीर्थ' असे ठेवण्यात आलेले आहे.

माघकवीच्या शिशुपालवध या महाकाव्यात विष्णुच्या अवतारात दत्तात्रेयाची गणना केलेली आहे.

सर्व पुराणातील श्रीदत्त विषयक सामुग्री वाचन करून व त्यावर विचार करून श्रीवासुदेवानंद सरस्वती उर्फ टेम्बेस्वामी यांनी 'दत्तपुराण' हा संस्कृत ग्रंथ व दत्त-महात्म्य' हा मराठी ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. भागवताच्या एकादश स्कंधात अवधूताचे चोवीस गुरु कथन करण्यात आलेले आहेत. उद्धव गीता ही पहिली मराठी एकादश टीका असून तिचे कर्ते भास्कर भट बोरकर हे आहेत. ते दत्तात्रेयाचे एक श्रेष्ठ उपासक म्हणून ज्ञात होते.

श्री दत्तात्रेयांनी या पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या वेळी विविध कारणास्तव १६ अवतार घेतले त्या सोळा अवतारांची नावे व जन्मतिथ्या अशा : १) योगिराज (कार्तिक शु. पौर्णिमा), २) अत्रिवरद (कार्तिक कृ. प्रतिपदा), ३) दत्तात्रेय (कार्तिक कृ. द्वितीया), ४) कालाग्निशमन (मार्गशीर्ष शु. चतुर्दशी), ५) योगिजन

वल्लभ (मार्गशीर्ष शु. पौर्णिमा), ६) लीला विश्वंभर (पौष शु. पौर्णिमा), ७) सिद्धराज (माघ शु. पौर्णिमा), ८) ज्ञानसागर (फाल्गुन शु. दशमी) ९) विश्वंभर (चैत्र शु. पौर्णिमा), १०, मयामुक्त (वैशाख शु. पौर्णिमा), ११) मायामुक्त (ज्येष्ठ शु. त्रयोदशी), १२) आदिगुरु (आषाढ शु. पौर्णिमा ) १३) शिवरूप (श्रावण शु. अष्टमी), १४) देवदेव ( भाद्रपद शु. चतुर्दशी), १५) दिगंबर (आश्विन शु. पौर्णिमा), १६) कृष्ण शामकमल नयन (कार्तिक शु. द्वादशी .

या १६ अवतारांच्या कथा वर्णन करणारा संस्कृत ग्रंथ श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी लिहिला असून त्याचे नाव श्री दत्तात्रेय षोडशावताराः असे आहे. या सोळा अवतारा' शिवाय दासोपंत हा एक सतरावा व सर्वज्ञावतार समजण्यात येतो.

दत्त संप्रदायात इतिहास काळातील पहिले दत्तावतार श्रीपाद श्रीवल्लभ हे होत; व दुसरे दत्तावतार श्री नरसिंह सरस्वती हे होत. त्याचप्रमाणे अक्कलकोटचे स्वामी महाराज, श्री माणिक प्रभु व भगवान श्री साईबाबा हे पण दत्तावतारच मानले जातात.

शांडिल्योपनिषद, भिक्षुकोपनिषद, अवधूततोपनिषद, जाबाल दर्शनोपनिषद व दत्तात्रेयोपनिषद या पाच उपनिषदातून दत्तात्रेयाचे उल्लेख आढळून येतात. अवधूत गीता हा प्रसिद्ध सांप्रदायक ग्रंथ दत्तप्रणीतच समजला जातो. तंत्र ग्रंथात "त्रिपुरोपास्ति पद्धति" या नावाचा ग्रंथ दत्तात्रेयाने केला असल्याची कथा 'त्रिपुरा रहस्य' या ग्रंथात आहे. 'परशुराम कल्पसूत्रम' हा ग्रंथ दत्तप्रणीत तंत्र विज्ञानाचे सार होय.

श्री दत्तात्रेयाचा निवास औदुंबरतळी असतो अशी सर्वत्र श्रद्धा आहे. सद्यास्थितीत दत्ताशिवाय लौकरात लौकर फल देणारे असे अन्य दैवत नाही अशी भावना सर्व सामान्य भाविकांची आहे. माध्यान्ही येणारा भिक्षेकरी हा जणू काय दत्तरुपाने आपले दातृत्व पहाण्यासाठीच येतो अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे. मार्गशीर्ष शुक्लपक्षातील पौर्णिमा ही दत्तजयंती म्हणून ओळखली जाते. ●

...........

# भगवान दत्तात्रेयाचे निद्रास्थान–माहूर

● भगवान श्रीदत्तात्रेयाच्या विहार स्थानात माहूर हे त्यांचे निद्रास्थान मानले जाते. तो प्रयाग येथे प्रातःस्नान करतो. पांचाळेश्वरी अनुष्ठान करतो, कोल्हापूरी भिक्षाटन करतो व मातापूरी म्हणजे माहूरला शयन करतो अशी कल्पना आहे. मराठवाडा व विदर्भ यांच्या सीमेवर माहूर हे तीर्थक्षेत्र आहे. हे खरे रेणूकेचे स्थान. रेणूकेने जमदग्नी ऋषींना स्वयंवरात वरले. असे सांगतात की भगवान दत्तात्रेयाचा आश्रम येथेच होता. दत्तात्रेय हे जमदग्नीचे गुरु त्यांच्या आज्ञेवरून महर्षि जमदग्नी आपली पत्नी रेणुकेसह येथे रहावयास आले व पुढे येथेच त्यांनी समाधी घेतली. या क्षेत्राचा उल्लेख भागवत, मार्कंडेय पुराण, गुरु चरित्र इ. धर्मग्रंथातून आढळतो. एक शक्तिपीठ म्हणून माहूरचा महिमा आहे. श्रीदत्तात्रेयाचे चरित्रच माहूरच्या भूमित घडले म्हणून माहूरला 'निरंजन माहूर' असे म्हणतात. याचा अर्थ असा की जन्म मरणादिकास कारण जे प्रारब्ध ते ज्यास नाही असा ईश्वरादिअंश दत्तात्रेय येथे असून त्यांची आई जी अनुसूया तिचे हे रहाण्याचे ठिकाण. 'माहेर' या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'माहूर' हा शब्द आला असावा. सती अनुसूयेचे माहेर म्हणजेच माहूर. कृतयुगात माहूरला 'आमलीग्राम' त्रेता युगात सिद्धपूर, द्वापरयुगात देवनगर व कलियुगात मातापूर अशी या क्षेत्राल पडलेली नावे आहेत. माहूरक्षेत्री श्रीदत्तगुरुंनी एका स्त्रीचा मृतपती पुन्हा संजीवीत केला अशी कथा गुरु चरित्रात आहे. ●



## श्रीसाईलीला

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७७**

श्रीसाई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयींच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

श्रीसाईभक्तांनी आपापले अनुभव कागदाच्या एकाच बाजूवर सुवाच्य लिहून ते ३० सप्टेंबर ७७ पर्यंत संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**मुखपृष्ठावर बाबांचे उत्कृष्ट चित्र** **किंमत सव्वा रुपया**



भगवान श्री श्रीपाद वल्लभ, पीठापूरम्

# श्रीदत्तात्रेयांचे पहिले अवतार–श्री श्रीपाद श्रीवल्लभ

● श्री श्रीपाद श्रीवल्लभ हे भगवान श्री दत्तात्रेयाचे इतिहास काळातील पहिले अवतार समजले जातात. त्यांचा काळ इ. सन १३२० ते १३५० असावा. त्यांचे जन्मस्थान मद्रास राज्यातील गोदावरी जिल्ह्यातील पीठापूर हे ठिकाण होय. ते राजमहेंद्रीच्या उत्तरेस गोदावरीच्या मुखाजवळ आहे. श्रीपाद श्रीवल्लभांच्या वडीलांचे नाव आपळराजा व आईचे सुमती. साक्षात् अवधूताने सुमतीला आशीर्वाद दिला व त्यानुसार तिला पुत्र झाला म्हणून त्याचे नाव 'श्रीपाद' असे ठेवले. वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी वेदाध्ययन पूर्ण केले व सहा शास्त्रे व अठरा पुराणे त्यांच्या जिभेवर त्यावेळी खेळत होती. ऐन तारुण्यात त्यांनी घरदार-माता-पिता-ऐश्वर्य यांचा त्याग केला. तिर्थाटणे केली व आत्मज्ञान मिळऊन आपला जन्म हा लोकोद्धारासाठी आहे याची जाणीव ठेवली. आपल्या हयातीत त्यांनी अनेक चमत्कार करून लोकांची संकटे दूर केली. खुद्द आपल्या दोघा अपंग भावांकडे त्यांनी अमृत दृष्टीने पाहिले आणि चमत्कार असा झाला की ते दोघेही भाऊ अगदी अव्यंग बनले. अशा अनेक चमत्कारानंतर श्रीपाद वल्लभांनी कुरव पुरीत आश्विन वद्य द्वादशीस निजानंदी गमन केले. हा दिवस आज गुरु द्वादशी म्हणून मोठ्या श्रद्धेने पाळला जातो. शके १२४५ ते १२७५ याकाळात श्रींचे अवतार कार्य असावे असा अंदाज आहे.

..............

# भगवान दत्तात्रेयांचे दुसरे अवतार–
# श्रीनृसिंह सरस्वती

● श्रीनृसिंह सरस्वती हे भगवान श्री दत्तात्रेयाचे इतिहास काळातील दुसरे अवतार समजले जातात. गाणगापूर, औदुंबर, नृसिंहवाडी उर्फ नरसोबाची वाडी ही नृसिंह सरस्वतींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली श्री सद्‌गुरु भक्तांची कडकडीत जागृत अशी स्थाने आहेत. श्रीनृसिंह सरस्वतींच्या तपाच्या तेजाने, शास्त्रपूर्व आचाराने व बुद्धीच्या प्रभावाने महाराष्ट्रात दत्तसंप्रदायाचा सर्वत्र प्रसार झाला. श्रीनृसिंह सरस्वतींचा जन्म वऱ्हाडात कारंजा येथे इ. स. १४०८ मधे झाला. त्यांचे मूळ नाव नरहरी जन्मतःच ते जगावेगळे वागू लागले. बाल्यावस्थेत त्यांनी मौनव्रत स्वीकारले



श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज, कारंजा

व उच्चार केला तो म्हणजे 'ओम' काराचा स्वतःच्या मौजीबंधन प्रसंगी चार वेद व सहा शास्त्रे यांचे त्यांनी एकाएकी पठण केलेले पाहून सारेच जग चकीत झाले. मुंज पार पडल्यावर त्यांनी मातेचा निरोप घेतला व तीर्थाटणे केली, आपल्या नरहरी नावाचे नृसिंह नावात रुपांतर केले. १३४८ साली ते पुन्हा कारंजा येथे आले. औदुंबर वृक्षाखाली श्री सद्गुरुनी नृसिंहवाडी येथे १२ वर्षे तपश्चर्या केली होती. म्हणून नृसिंहवाडीला श्रीदत्ताची राजधानी असे म्हणतात. श्री नृसिंहाच्या वडिलांचे नाव माधव व आईचे नाव अंबासती. गाणगापूर ही महाराजांची अनुष्ठान भूमी होय. माघ शुद्ध प्रतिपदा शके १३८० हा श्रीनृसिंह सरस्वती दत्तमहाराज गुप्त झाल्याचा दिवस होय.

*



श्रीमाणिक प्रभु महाराज, माणिक नगर

# श्रीदत्तात्रेयांचे साक्षात् अवतार–श्री माणिक प्रभु

जुन्या निजाम राज्यातल्या हुमणाबाद या शहराजवळच्या लाडवंती या गावी माणिक प्रभूंचा जन्म मार्गशीर्ष शु. चतुर्थी शके १७२९ ला झाला. त्यांचे वडिलांचे नाव मनोहरपंत हरकुडे व आईचे बायम्मा. माणिक हे मनोहरपंतांचे दुसरे अपत्य. त्यांच्या पहिल्या अपत्याचे नाव हनुमान. त्यांना हनुमंताचा अवतार असे समजतात हा मुलगा मुंज होईपर्यंत काही एक बोलला नाही. यानाच पुढे लोक हनुमान दाद उर्फ दादा महाराज म्हणू लागले. मनोहरपंतांच्या तिसऱ्या मुलाचे नाव नृसिंह तिन्ही मुलांच्या जन्मानंतर मनोहरपंतांनी इहलोक सोडला. या तिन्ही मुलांच्या पालन-पोषणाची जबाबदारी आई व सख्ये मामा बळवंतराव यांचेवर येऊन पडली. लहानपणी माणिक प्रभूंचे शिक्षणाकडे अजिबात लक्ष नव्हते. प्रभूंनी लहानपणीच लीला करुन दाखविल्या. आपल्या गोविंदा नामक एका मृत झालेल्या मित्राला त्यांनी पुन्हा जिवंत करून दाखविले ! मुले न होणाऱ्या आंबेवालीस भरपूर अपत्य संपदा दिली. मेलेल्या पोपटाला हवेत फेकून देऊन त्याला पुन्हा जिवंत केले. कित्येकदा ते वेड्याप्रमाणे चाळे करीत म्हणून त्यांना लोक 'वेडाप्रभु' असे म्हणत. पण पुढे तर याच प्रभुंनी अनेक व्याधी ग्रस्तांना रोगातून मुक्त केले तर अनेकांच्यावरची संकटे दूर केली. माणिकप्रभू हे साक्षात् दत्तात्रेयाचा अवतार समजले जातात. माणिकनगराची त्यांनी स्थापना केली व मार्गशीर्ष शुद्ध दशमी शके १७८७ या दिवशी त्यांनी गुप्तपणे समाधि घेतली. फळांमधे अंजीर त्यांना खूप प्रिय होते. "माणिक प्रभाकर" या संस्कृत ग्रंथात प्रभूंचे खरेखुरे चरित्र लिहिलेले असून ते प्रभूंचे प्रमुख शिष्य श्री बाप्पाचार्य यांनी लिहिले आहे.

———

# शिरडी–वृत्त माहे मे सन १९७७

या महिन्यात शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनाकरीता बाहेरगावची भक्त मंडळी बहुसंख्येने उपस्थीत होती. संपूर्ण महिना यात्रेच्या स्वरूपात गेला. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. ती खालील प्रमाणेः– कीर्तन :– १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी (शास्त्री) यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली. २) ह. भ. प. सौ. सरोज रा. बरडे यांचे कीर्तन.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. डॉ. अनिल मराठे. नासिक.
२) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाघचौरे शिरडी.

**गायन, वादन, भजन** :–१) श्री. रघुनाथ ना. केसकर अ. नगर. २) कु. वीणा र. केसकर. ३) सौ. कुंदा र. गुजराथी येवला. ४) श्री. सुर्यकांत वडळमाने भिवंडी. ५) श्री. बी. एस. बी. रामन ग्वालियर. ६) कु. संध्या म. रावढोरे नागपूर. ७) श्री. प्रभाकर ल. साने, वसई. ८) श्री. मकरंद कल्याणी इन्दौर. ९) श्रीपाद कल्याणी. १०) श्री. एम. बी. कल्याणी. ११) सौ. उषा कल्याणी; १२) कु. लीला शेलार, नौपाडा ठाणे. १३) श्री. नरेद्र सी. मालपेकर ठाणे. १४) श्रीसत्यसाई सेवा समिती मुंबई. १५) श्री. जी. एस. माधवराव. जबलपूर १६) सौ. शारदा र. जुन्नरकर मालाड मुंबई १७) श्री. मधुकर शं. हाटकर डोंबीवली; १८) सौ. उषाताई हाटकर. १९) श्री. के. टी. टिक्कू मुंबई. २०) श्री. सदाशिव गो. मापारडे व गजानन प्रासादिक भजन मंडळ, भिवंडी २१) श्री. वसंत पेंढरकर व मंडळी पुणे. २२) आद्यशक्ती रामायण प्रचारक मंडळ काशी; रामलीला कार्यक्रम.

**माननीयांच्या भेटी** :—

१) मा. श्री. एन. के. पारेख, सिटी सिव्हील कोर्ट मुंबई.
२) ,, ,, डी. पी. देसाई, हायकोर्ट जज्ज, गुजराथ राज्य.
३) ,, ,, एम. डी. कांबळी, हायकोर्ट जज्ज, मुंबई.
४) ,, ,, डी. एम. रेगे, हायकोर्ट जज्ज, मुंबई.
५) ,, ,, सुळे, जिल्हा न्यायाधीश अहमदनगर.
६) श्री. अरविंद वि. म्हात्रे, डे. मॅनेजर, शिपींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई

हवा पाणी :– शिरडी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

............

# दत्तावतार

साईब्रह्म तूं साईविष्णु तूं महेश्वर
तिन्ही अंश मिळूनि दत्तअवतार
तूं अखिल विश्वाचा रे पालनकर्ता
तूं अखिल जीवाचा रे विघ्नहर्ता

ज्ञान - भक्ती - कर्म योगी तुज भजती
जैसा भावे तैसा पावे असे उमजती
एकात अनेकाची कल्पना तुवां स्फुरली
शरण - अशरण सर्वांचा रे तूं वाली

हा मायेचा विश्वपसारा असे लटका
एक तुला जाणतां सर्वांतुनी सुटका
स्व - स्वरूपाची ओळख कैसी जाणावी
साईकृपेची खूण सोपी मनीं बाणावी

● शशिकला साळगांवकर
मुक्तानिवास, १५५ ब, नवीपेठ, सोलापूर.

---

# श्रीदत्त स्तवन

दत्त दत्त नाम घेई
वाचे नित्य मनुजा रे
कलीयुगी हा तारक मंत्र
भक्तासी हा आधार रे ॥ १ ॥
दत्त दत्त नाम घेई

हाती कमंडलू खांके झोळी
छाटी त्याची भगवी रे
श्वान पुढती धेनु मागे
पायी खडावा गर्जती रे ॥ २ ॥
दत्त दत्त नाम घेई

त्रिशूळ डमरु चक्र गदा ही
आयुधे त्यांचे हाती रे
दुष्टांचा संहार करण्यास्तव
हा असे अवतार रे ॥ ३ ॥
दत्त दत्त नाम घेई

भक्ता हाती ते धरिती रे
बालका जशी माय रे
चुकता तरी ते सावध करिती
कृपादृष्टीने पाहती रे ॥ ४ ॥
दत्त दत्त नाम घेई

त्रिभुवनी त्यांचा संचार रे
भक्तासाठी धावत येती रे
आर्त स्वराने हाक मारतां
दत्त दर्शन देती रे ॥ ५ ॥
दत्त दत्त नाम घेई

अनुभव घेऊनी पाही रे
मुक्तचि होऊनी जाई रे
नरजन्माचे सार्थक होईल
श्रद्धा गुरुवरी ठेवी रे ॥ ६ ॥
दत्त दत्त नाम घेई

त्रैमुर्तीचे दर्शन घडतां
आनंदी आनंद रे
त्या आनंदाच्या धुंदी मध्ये
मस्त होऊनी राही रे ॥ ७ ॥
दत्त दत्त नाम घेई

• महादेव दत्तात्रय भिडे
११९५, सदाशीव पेठ, पुणे ३०

# अश्रूचीं फुले !!!

सर्व सुखाचे आगर !
साईनाथाचा दरबार
प्रत्येकासी वाटे घर
हे पवित्र शिर्डीनगर !

बाबांच्या ह्या दरबारी
पावलांची गर्दी न्यारी !
पाप-पुण्याची बात न्यारी
परमेश्वर हा निराकारी

रोमारोमात दिसतो येथे साईनाथ
निराधारासी मिळतो मदतीचा हात
साक्ष देते ही दिव्या-दिव्यांची ज्योत
स्नेहावाचूनी पेटली ज्योत मंदिरात

बाबा जगासाठी जगले !
त्यांनी अनेका जगविले
बाबा जगातूनी गेले
आम्ही 'अश्रूची ती फुले'
समाधी मंदीरी वाहीले !!!

• जगदीश देवपुरकर
'सुलोच' गं. न. ५।२६४३ धुळे ( महाराष्ट्र )